# कृपेची दैवी नदी



ही एक काल्पनिक कथा असून त्यामध्ये भुते लोकांशी कशा प्रकारे खोटे बोलतात आणि देवाच्या प्रेमळ दयेकडे त्यांचे लक्ष जाऊ नये यासाठी त्यांच्या डोळ्यांवर कशी झापड आणतात आणि ख्रिस्त त्यांची कशी सुटका करतो याचे चित्रण आहे.

लेखक

जॉर्ज पॅटरसन आणि गॅलेन कुरा

नए मसीही समुदायों के नवशिक्ष अगुवों के लिये देखें तथा इसे और अन्य पौलुस तिमुथियुस अध्ययनों को निशुल्क **http:www.paul-timothy.net** से डाउनलोड करें

## प्रकरण 1

## व्हिक्टर व लोरी ह्यांना कृपेची नदी कशी मिळाली

व्हिक्टर एका लहानशा गावातून शहरात आला. तिथे तो लवकरच वेल्डिंग करायचे काम शिकला. त्याला एका मोटार दुरूस्तीच्या छोट्या दुकानात काम मिळाले. नवीन मित्रमंडळी शोधत असतानाच त्याची लोरीशी भेट होते. तीही नुकतीच ह्या शहरात आलेली असते.

त्यांची मैत्री वाढत जाते आणि ते दोघे विवाहबद्ध होतात. लोरीने त्यांचे छोटेसे घर आनंदाने भरून टाकले. ती करीत असलेल्या लहान लहान गोष्टींमधून घर हसते खेळते राहायचे आणि व्हिक्टरला याचे खूप आश्चर्य खूप वाचन करणाऱ्या स्त्रिया फुले आणि इतर बारीक बारीक गोष्टींनी आपले घर प्रसन्न ठेवीत. लोरीही तसेच करीत असे. व्हिक्टरने तिला म्हटले, "लोरी तू नुसतीच सुंदर नाहीस तर तुझ्याकडे सौंदर्यदृष्टीही आहे. तुझ्यामुळे मला दररोज तुझ्याबद्दल आणि जीवनाविषयी काहीतरी अद्‌भुत गोष्ट समजतात!"

तिच्या लांबसडक दाट काळ्याभोर केसांशी चाळा करीत म्हणाला, "मी अतिशय भाग्यवान आहे!"

तिने त्याच्या दृढनिश्चयी चेहऱ्याकडे पाहिले आणि अवघड कठीण जबाबदाऱ्या विनातक्रार स्वीकारणारा पुरुष तिच्या दृष्टीस पडला. "तुम्ही फार विचारी आहात व्हिक्टर" तिने हळूवार आवाजात म्हटले, "तुम्ही मोठे विचारवंत आहात. आपले जीवन कधीच कंटाळवाणे व नीरस होणार नाही! तुम्ही नेहमीच... कसे सांगू? तुम्ही फार विचाराने वागता!"

साध्या वाटणाऱ्या गोष्टीतून नव निर्मिती करून विचार करायचा, त्यातून साधेच जग फुलवायचे, त्या दोघांचे जीवन म्हणजे जणू स्वर्गच होता. पण, एके दिवशी संध्याकाळी व्हिक्टर उदासवाण्या चहेऱ्याने घरी आला. इतक्या दिवसाच्या सहवासाने लोरी त्याचा चेहरा वाचण्यास शिकली होती. इतर कोणाही पेक्षा त्याच्या भावना तिच्या चट्‌कन लक्षात येत असत. "काय झाले?"

"मोटर दुरूस्तीच्या दुकानात आता वेल्डरची गरज नाही. मला आता दुसरी नोकरी शोधावी लागणार."

ती मट्‌कन खाली बसली. दीर्घश्वास घेतला आणि त्याचे हात हातात घेतले, "तुम्ही लवकरच दुसरी नोकरी शोधा, कारण आता लवकरच एक गोजिरवाणा पाहुणा आपल्या घरी येणार आहे. आपल्याला बाळ होणार आहे हे आजच मला समजले!"

तीन आठवड्यांनंतर व्हिक्टर घरी परतला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील निराशेचे ढग अधिकच गडद झाल्याचे तिला दिसले. "आता काय झाले?"

"कोणालाही आता वेल्डिंग करणाऱ्याची गरज नाही. पुढच्या महिन्याचे घरभाडेही आपल्याला देता येणार नाही. मला फार काळजी वाटते."

"मलाही बऱ्याच गोष्टींची काळजी वाटते," लोरीने कबूली दिली. "कधी भला भीती वाटते की मी पूर्वी केलेल्या वाईट गोष्टींची शिक्षा देव मला देत आहे."

"माझ्या मनातही बरेच वेळा हाच विचार येतो," व्हिक्टरने तिच्या सुरात सूर मिसळला, "माझा चुलत भाऊ भेटला होता त्याने सांगितले की आज काही मित्र एका हिंदू स्वामीकडे जाऊन मनन चिंतन करणार आहेत. आपणही त्यांच्यासोबत जाऊ या; नाहीतरी आपण कोणताच धर्म नीटपणे पाळत नाही."

"हे ठिक वाटते, व्हिक्टर, माझ्या जीवनाचा खोल अर्थ शोधण्याची माझी इच्छा आहे. आपल्या जीवनाचा असा माझ्या बोलण्याचा अर्थ आहे. अनुभव घेण्यास माझी तयारी आहे.''

"ठिक आहे तर मग आपण तिथेच भेटू या," व्हिक्टरने सुचवले, "मी प्रथम घरमालकाला जाऊन भेटतो. ते तिथे जवळच राहतात. घरभाड्यासाठी थोडे थांबण्याची त्यांना विनंती करतो. हा स्वामींना भेटण्याचा पत्ता घे. मला यायला कदाचित थोडा उशीर होईल."

व्हिक्टरने लोरीला दिलेला पत्ता अस्पष्ट होता त्यामुळे ती चुकीच्या घरी गेली. "चिंतन मननाची सभा येथेच होणार आहे का?" तिने दारातूनच विचारले.

"मनन चिंतन? हो पण तुम्ही लवकर आलात" लोरीच्या वयाच्याच एका स्त्रीने तिचे स्वागत केले. "आत या. माझे नाव ज्युली. माझे पती टीनो हेच गटाचे नेतृत्व करतात. आज रात्रीच्या चर्चेचे पुढारीपण तेच कणार आहेत. बसा थोडा चहा घ्या."

लवकरच इतरही लोक आले. काहीजण सोबत पवित्र शास्त्र घेऊन होते. येथे जमलेले लोक येशू ख्रिस्ताच्या नावात एकमेकांसाठी प्रार्थना करीत असल्याचे पाहून लोरीला आश्यर्चच वाटले. एका मध्यमवयीन स्त्रीने तिला येशूच्या प्रीतीची ओळख कशी झाली ते सांगितले. "मी खूप पापे केली होती. त्यांची क्षमा झाली नव्हती. मी केलेली सर्व वाईट कृत्ये देवाची कृपा झाकून टाकते हे काही माल ठाऊक नव्हते. परंतु....." पुढचे काही सांगणे तिला शक्य झाले नाही; कारण अत्यंत आनंदामुळे तिला हुंदके येऊ लागले.

एका वयस्कर गृहस्थांनी जरा भीत भीतच सुरुवात केली. त्यांना लोकांसमोर बोलण्याची सवय नव्हती ते म्हणाले, "गेले अनेक आठवडे तुम्ही माझ्याकरिता प्रार्थना केली. माझा घशाचा आजार बरा व्हावा याकरिता तुम्ही देवाकडे काकुळतीची विनवणी केलीत आणि त्याने माझा आजार बरा केला. मी कोणते नवे औषध घेतले असे डॉक्टरांनी मला विचारले, तेव्हा मी त्यांना प्रार्थनेचे औषध घेतल्याचे सांगितले. फक्त येशूच्या नावाने प्रार्थना केली; डॉक्टरांनी म्हटले 'तेच औषध असावे कारण अशा प्रकारचा आजार पूर्णपणे बरे करणारे औषध माझ्यातरी माहितीत नाही."

"प्रभुची स्तुती असो!" ज्युली अगदी उस्फूर्तपणे बोलली. तिचे अशा प्रकारचे बोलणे ऐकून तिच्या जवळच बसलेली लोरी आश्चर्यचकीत झाली.

एका तरुणाने आपली साक्ष दिली, "माझी अवस्था किती वाईट होती हे तुम्हाला माहीतच आहे. मी अंमली पदार्थांच्या आहारी गेलो होतो. परंतु आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताने मला त्यातून सोडविले."

तिथे जमलेल्या सर्वांनी पुन्हा एकदा प्रभुची स्तुती केली. "आम्ही तुला देवाच्या कृपेत वाढण्यास साहाय्य करू," उसे आश्वासन टीनो ह्यांनी त्या तरुणाला दिले.

लोरी ज्युलीच्या कानात कुजबुजली, "मला कोणी बोलायला सांगणार तर नाही ना! हे सर्व मला नवीन आहे."

"तुला बोलायचे असेल तरच तू बोल लोरी," ज्युलीचे पती टीनो मोठे अभ्यासू गृहस्थ दिसत होते जाड भिंगाचा चष्मा घातलेले टीनो तरुण प्राध्यापक वाटत होते. ते विश्वासाने ठाम स्पष्ट आवाजात बोलत होते. "ह्या मनुष्यावर भरवंसा ठेवण्यास हरकत नाही" त्यांच्या हसऱ्या चेहऱ्याचा अभ्यास करीत लोरीने स्वतःशी विचार केला.

टीनो ह्यांनी जमलेल्या लोकांना म्हटले, "देव कृपेविषयी काय सांगते ते आपण पवित्र शास्त्रातून पाहू या. कृपया रोमकरांस पत्राचा पाचवा अध्याय काढा." ज्युलीने लोरीला पवित्र शास्त्र दिले. पण तिला काही रोमकरांस पत्राचे पुस्तक मिळाले नाही. "आण, मी काढून देते" ज्युली हळूवारपणे म्हणाली ज्युली प्रत्येक व्यक्तीकडे शांतपणे आणि तत्परतेने जात होती. त्यांचे स्वागत करीत होती. त्यांच्या आरोग्याची व कुटुबियांची आपुलकीने विचारपूस करीत होती आणि त्यांना चहाही देत होती: हे सर्व लोरी पाहात होती. हसून प्रतिसाद देत होती तिच्या आपुलकीच्या वागणुकीमुळे पाहुण्यांनाही आपलेपणा वाटत होता.

"तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली, अशासाठी की जसे पापाने मरणाच्या योगे राज्य केले. तसे कृपेने नीतिमत्ताच्या योगे सार्वकालिक जीवनासाठी येशू ख्रिस्त आपला प्रभु ह्याच्याद्वारे राज्य करावे. अंमली पदार्थांच्या विळख्यातून सुटका झालेला तरुण भावनाविवश होऊन वाचत होता."

"यातून आपल्याला देवाविषयी काय समजते?" टीनो ह्यांनी लोकांना विचारले.

काही वेळ त्यांनी देवाच्या विपुल कृपेविषयी चर्चा केली आणि मग त्यांनी एकेक वचन वाचायला सुरुवात केली. यालाच टीनो 'कृपेची नदी' असे म्हणतात.

एका वृद्ध महिलेने सुरुवात केली तिचे कपडे जुने होते. बाई अत्यंत गरीब दिसत होती. "यशया 55:1 हे वचन अभिवचन देते 'अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या, जवळ पैका नसलेले तुम्ही या सौदा करा खा या!' हे अभिवचन मला फार आवडते. आजारातून बरे झालेले गृहस्थ हळू आवाजात स्तोत्र 39:8-9 वाचू लागले, तुझ्या घरातील समृद्धीने त्यांची तृप्ती होईल आणि तूं आपल्या सुखांच्या नदीचे पाणी त्यांना पाजशील कारण जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे."

कोणी ना कोणी निरनिराळ्या पुस्तकातून एकेक वचन वाचत होते. प्रत्येक वेळी वचन वाचतांना लोरीच्या अंत:करणात खळबळ माजत असे. सुमारे दहा वर्षे वयाच्या मुलाने लाजत लाजत प्रकटी 22:12 ही वचन तोंडपाठ म्हणून दाखवले: "नंतर त्याने देवाच्या व कोकऱ्याच्या राजासनातून निघालेली नगरीच्या मार्गावरून वाहणारी जीवनाच्या पाण्याची स्फटिकासारखी नितळ नदी मला दाखवली नदीच्या दोन्ही बाजूस बारा जातीची फळे देणारे जीवनाचे झाड होते. ते दर महिन्यास आपली फळे देते. आणि त्या झाडाची पाने राष्ट्रांच्या आरोग्यासाठी उपयोगी पडतात."

अचानक एक गडद रंगाचे कपडे घातलेली स्त्री उठून हळूच निघून गेली. संपूर्ण सभेमध्ये ती बोलली नव्हती. तिचा चेहराही निर्विकार होता. मग देवाच्या क्षमाशीलतेविषयी स्तुती करणाऱ्या मध्यमवयीन महिलेने योहान 7:37-38 ही वचने आनंदाच्या सुरात वाचली: "येशू उभा राहून मोठ्याने म्हणाला 'कोणी तान्हेला असला तर त्याने माझ्याकडे यावे आणि त्याने जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्यांच्यांतून शास्त्रात सांगितल्याप्रमाणे जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील."

यानंतर ते सर्वजण दोन तीन तीनचे गट करून एकमेकांशी बोलू लागले. काही लोक प्रार्थना करू लागले. "येथे ज्या विषयावर बोलणे झाले ते समजले का?" उसे ज्युलीने लोरीला विचारले.

"फारसे काही समजले नाही. कृपेच्या नदीविषयी मी यापूर्वी केव्हाच ऐकले नव्हते. पण याबद्दल माझ्या मनात कुतुहल जागे झाले आहे."

सभेचा औपचारिक भाग संपला तरी कोणीही उठून गेले नाही. काही जण बोलत उभे राहिले. तर इतर तसेच गटांमध्ये बसून हलक्या आवाजात बोलत होते. ज्युलीने तिच्या पतीला सुचविले, "टीनो कृपा करून कृपेची नदी म्हणजे काय हे आम्हांला जरा विस्ताराने सांगा."

"आनंदाने!" ते लोरीकडे तोड करून बसले. क्षणभर घुटमळले. बहुधा नेमके विस्ताराने कसे सांगायचे याचा विचार करीत असावेत. अचानक त्यांच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. "कृपा हा तर माझा अत्यंत आवडता विषय आहे! देवाची कृपा म्हणजे पात्रता नसताना झालेला त्याचा अनुग्रह, त्याची परिपूर्ण प्रीति आणि अपार दयाळूपणा होय. ही आम्हांला मिळावी अशी आमची योग्यता कधीच नव्हती. येशू ख्रिस्त आमच्या पातकांपासून पृथ्वीवरील आमच्या उर्वरित जीवनात आणि सर्वकाळासाठी आमचे तारण करतो तेव्हा केवळ विश्वासाने आम्हांला त्याची कृपा मिळते. याला मी नदी असे म्हणते कारण पवित्र शास्त्र सांगते, जेथे पाप वाढते तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली; तसेच पवित्र शास्त्रातील इतर शास्त्रभाग देवाच्या स्वर्गीय राजासनापासून वाहणाऱ्या आरोग्यदायी पाण्याच्या महान नदीविषयी रूपकात्मकरीतीने सांगतात.

"याबद्दल आपल्याला कोठे पहायला मिळते?" लोरीने विचारले.

"क्षमा मिळण्यासाठी आपल्या तारणाऱ्या येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा. पवित्र आत्मा देवपित्याकडून येतो, विश्वास ठेवणाऱ्यांसाठी तो विनामूल्य विपुल जीवन आणतो. लोरी, त्याने तुला नवे शुद्ध विपुल आणि सार्वकालिक जीवन देण्याचे अभिवचन दिले आहे. हे सर्व विनामूल्य आहे! ही देवाची अद्‌भुत देणगी आहे! पवित्र शास्त्र 14:16-17 मध्ये नमूद करते की प्रभू येशू त्याच्या स्वर्गातील पित्याची सर्वसमर्थ देवाची प्रार्थना

केली आणि त्याचा पवित्र आत्मा आमच्याकडे पाठविण्याची विनंती केली. हीच देवाची कृपा आमच्याकडे आणणारी नदी आहे!"

"हे असे मी यापूर्वी कधीच ऐकले नव्हते" लोरीने कबूली दिली, "देव आमची पातके आणि सत्कृत्ये यानुसार आमचा न्याय करणार आहे एवढेच मी ऐकले आहे. कृपेसारख्या अद्‌भुत गोष्टीविषयी माझे आई वडील आणि शिक्षकांनी मला काहीच सांगितले नाही याचे मला आश्चर्य वाटते."

"पवित्र शास्त्र सांगते की आमचा सर्वात मोठा शत्रु सैतान लोकांना आध्यात्मिकरित्या अंध करतो," टीनो ह्यांनी स्पष्ट केले.

"कृपेच्या उदंड प्रवाहापासून सैतान आमचे लक्ष दुसरीकडे वळवतो. देव कोणाही मनुष्याला न समजणाऱ्या अशा त्याच्या अपार ज्ञानाने सैतानाला असे करू देतो. आमच्या विश्वासाची कसोटी पाहण्यासाठी तो सैतानाला आमच्याशी खोटे बोलू देतो. आम्ही सैतानाचा प्रतिकार करून देवाची कृपा आमच्या जीवनात वाहू दिली पाहिजे. काही लोकांची सैतानाच्या खोटेपणावर विश्वास ठेवण्याची तयारी असते; कारण आपल्या जीवनांचे नियंत्रण स्वत:च करण्याची त्यांची इच्छा असते. ते देवाला त्यांच्या अंत:करणात प्रवेश करण्यास मज्जाव करतात. देवाच्या आत्म्याने त्यांना विश्वास द्यावा असे त्यांना वाटत नाही. आपल्या तारणाऱ्या येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने मिळणाऱ्या देवाच्या प्रीतीचा शोध तुम्ही आमचे सहाय्य घेऊन कराल अशी मला आशा वाटते."

लोरीने ज्युलीला विचारले, "आज संध्याकाळी तुम्ही जे केले तसेच मनन चिंतन करता का? तुझे पती टीनो हे दैवी स्वामी आहेत का?"

"नाही, नाही! स्वामींचा ग्रुप रस्याच्या पलिकडे आहे. स्वामी आणि त्याचे अनुयायी आतापर्यंत अमंली पदार्थांच्या नशेत अगदी चूर होऊन गेले असतील. आमचा एक ख्रिस्ती गृह गट आहे, हे एक लहानसे चर्च आहे. तू चुकून येथे आलीस का?"

"ही माझ्या हातून घडलेली सर्वात चांगली चूक आहे असे मला वाटते. अशा प्रकारचा आनंद आणि प्रीति मी यापूर्वी कधीच पाहिली नव्हती."

## प्रकरण 2

## व्हिक्टर व लोरी ह्यांना सार्वकालीक तारणाची खात्री कशी मिळाली

इकडे घरी, देवाच्या कृपेच्या अद्‌भुत नदीविषयी मिळालेली सर्व माहिती लोरीने व्हिक्टरला सांगितली ही नदी प्रचंड मोठी आहे! त्या स्वामीनी म्हणजे त्या ख्रिस्ती गुरूनी त्यांना काय म्हणतात ते ठाऊक नाही मला, सांगितले की अमेझौन, नाईल आणि गंगा ह्या नद्या सर्व एकत्र केल्यावर जेवढी मोठी नदी तयार होईल त्याहून ही कृपेची नदी पुष्कळ मोठी आहे. ह्या नदीचा प्रवाह स्वर्गातून देवाच्या राजासनापासून सतत वाहात असतो."

"तुला नेमके काय म्हणायचे आहे?" व्हिक्टरने विचारले, "पृथ्वीवर अशी कोणतीही नदी नाही!"

"त्यांचे पुढारी टीनो ह्यांनी सांगितले की कृपेची नदी आमच्या इतकी जवळून वाहते की कोणत्याही क्षणी तिच्यातून आम्हांला पाणी पिता येते; कारण आपण श्वास घेतो ती हवा जितकी जवळ आहे तितकाच देवाचा पवित्र आत्मा जवळ आहे."

"ते लोक ख्रिस्ती आहेत का?"

"त्यांनी सांगितले की त्यांचे येशू ख्रिस्तावर प्रेम आहे त्याच्याविषयी ते खूप बोलले. यजमान टीनो ह्यांनी सांगितले की देवावरील आमचा विश्वास कमकुवत झाला की आम्ही सैतानाच्या खोट्या गोष्टी ऐकून जीवनाच्या पाण्यावरील नजर दुसरीकडे वळवितो. आमची अंत:करणे तहानेने व्याकूळ होतात. आमचे आत्मे शुष्क कोरडे होतात. त्यांनी असेही सांगितले की देवाच्या कृपेविषयी आम्ही संशय घेतो; तेव्हा आम्ही नियमावर बोट ठेवून चालणारे होतो."

"थांब! तू तर मला मागे टाकून बरीच पुढे गेलीस!" व्हिक्टर आश्चर्याने म्हणाला, "त्या सभेत तुला काय प्यायला मिळाले? तुम्ही अमंली पदार्थांचे सेवन केले का? नियमावर बोट ठेवून चालणे,' ह्या म्हणण्याचा अर्थ काय?"

"केवढे हे प्रश्न! मला वाटते त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होता की आम्ही निरर्थक धार्मिक नियम पाळून स्वत:ला पवित्र करण्याचा प्रयत्न करतो. आम्ही कृपेच्या नदीकडे पाठ फिरवतो आणि सोबत इतरांनाही सहजपणे पाणी पिऊ देत नाही. आमच्या अंत:करणांमध्ये देवाचे कार्य होऊ देण्याऐवजी आम्ही मानवी कर्मकांडे व धार्मिक कृत्ये करतो."

"त्यांनी उग्र वासाचा धूप वगैरे जाळला का? त्यांनी भयप्रद चित्रविचित्र चित्रे लावली होती का? भेसूर आवाजाची विद्युत यंत्रे वापरली का?"

"अजिबात नाही! अहो, त्यांनी असले काहीही केले नाही. त्यांनी सांगितले की कृपेमुळे प्रीति, आनंद आणि क्षमा मिळते. ही कृपा विद्युत उपकरणे सुंदर इमारती, सुंगधी धूप किंवा रहस्यमय वाटणाऱ्या मंत्रांच्या उच्चारातून नाही तर देवाकडून लोकांच्या द्वारे येते."

त्याच आठवड्यामध्ये टीनो व ज्युली ह्यांनी व्हिक्टर व लोरी ह्यांची भेट घेतली. टीनोंनी व्हिक्टरला विचारले, "ख्रिस्ताचे मरण व पुनरूत्थानाचा खरा सत्य कथा वृत्तांत, सुवार्ता तुम्हांला सांगू का? येशूवर विश्वास ठेवून देवाकडे वळणाऱ्या सर्वांना क्षमा करून सार्वकालिक जीवन देण्याचे अभिवचन तो देतो."

"हो सांगा की असे इथे बसा, लोरी चहा आण गं."

टीनोनी लूक 24:46–48 ही वचने वाचली आणि त्याचा थोडक्यात सारांश सांगितला. "सर्व राष्ट्रातील लोक देवाकडे वळतात येशूचे मरण व पुनरूत्थानाची सुवार्ता, ज्याद्वारे तो आमचे आमच्या पातकांपासून तारण करून आम्हांला सार्वकालिक जीवन देतो, स्वीकारतात तेव्हा देव त्यांची क्षमा करतो."

"हे ऐकायला बरे वाटले तरी खरे वाटत नाही," व्हिक्टरने तर्क केला. याविषयी त्याने पुष्कळ प्रश्न विचारले.

तेथून निघण्यापूर्वी टीनो व ज्युलीने त्या उभयतांना दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळच्या सभेचे आमंत्रण दिले. सभेमध्ये इश्माएलने टीनोंना सभेचे पुढारीपण करण्यास मदत केली. ह्याच इश्माएलने व्हिक्टरला म्हटले "तुम्ही वेल्डिंगचे काम करता असे मी ऐकले. माझे एक लहानसे लोखंडाचे काम करण्याचे दुकान आहे आणि मला एका वेल्डरची जरूर आहे."

दुसऱ्या दिवसापासून व्हिक्टर इश्माएलच्या दुकानात कामाला जाऊ लागला त्या रात्री लोरीला घट्ट अलिंगन देत व्हिक्टरने प्रश्न केला, "त्या ख्रिस्ती लोकांप्रमाणे आपणही प्रार्थना करून माझ्या नव्या नोकरीबद्दल देवाला धन्यवाद द्यायचे का?"

आपली नवी मित्रमंडळी करतात त्या प्रमाणे माझे स्वत:चे शब्द वापरून प्रार्थना करण्याची ही माझी पहिलीच वेळ असेल."

आणखी एका सभेनंतर व्हिक्टर व लोरी ह्यांनी एकाच सर्वसमर्थ देवाच्या दैवी पुत्राची प्रार्थना करून त्यांची त्यांच्या पातकांपासून क्षमा करण्याची विनंती केली. काही विश्वासणारे त्यांच्याशी बोलण्यासाठी मागे थांबले. "मला खूप हलके वाटते!" लोरीने त्यांना सांगितले.

"तुम्ही पश्चात्ताप करून आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे," टीनोंनी आग्रहाने म्हटले, "तर तुम्ही बातिस्मा घेतला पाहिजे."

"थांबा टीनो!" दुकान मालक इश्माएलने मुद्दा मांडला." त्यांचा पालट झाला आहे यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी त्यांनी प्रथम आपली जीवने सुव्यवस्थित केली पाहिजेत. प्रत्येक गोष्ट सुव्यवास्थित केली पाहिजे! व्हिक्टर माझ्या दुकानात वेल्डिंगचे काम करतात. परंतु, एखाद्या वेळेस एखादे काम बिघडले तर ते कधी कधी

वाईट भाषा वापरतात अपशब्द उच्चारतात. लोरी तुम्ही सुद्धा ख्रिस्ती लोकांप्रमाणे कपडे घालण्यास शिकले पाहिजे. तुम्ही खूप सौंदर्यप्रसाधने वापरता. व्हिक्टर तुम्ही धुम्रपन करणे सोडले पाहिजे. तुम्ही किमान एक वर्षभर थांबून आमचे सर्व सिद्धांत तत्त्वे शिकणे अगत्याचे ठरेल. मग या दरम्यानच्या काळात तुम्ही पाप केले नाही; तर आम्ही तुम्हांला बाप्तिस्मा देऊ." तुम्ही आमच्यावर अन्याय करीत आहात असे लोरीला म्हणायचे होते; पण, अशा ठाम दृढनिश्चयी माणसाला विरोध करण्याचे धाडस तिला झाले नाही. इश्माएल भरदार छातीचा बळकट बाहूंचा चांगला उंचापुरा तगडा धिप्पाड असा होता. त्यांचा चेहरा करारी निश्चयी होता ते कधीही स्मितहास्यही करीत नसत."

"इश्माएल!" टीनोंनी हरकत घेतली, "नव्या विश्वासणाऱ्यांचा विश्वास प्रोषितांनी ह्या प्रकारे कधीच तपासून पाहिला नाही."

इश्माएलने तिकडे लक्षच दिले नाही. त्यांनी व्हिक्टरकडे एक कागद दिला आणि सांगितले "या कागदावर मी काही नियमांची यादी दिलेली आहे. आमच्या गटाचे अधिकृत सदस्य होण्यासाठी नवीन विश्वासणाऱ्यांनी हे नियम पाळणे आवश्यक आहेत. सर्व नवीन सदस्यांनी प्रथम अंमली पदार्थ घेणे, मद्यापन करणे, व्यभिचार करणे, पत्ते जुगार खेळणे, सर्व प्रकारचे नाच गाणे करणे, धुम्रपान करणे, अपशब्द वापरणे, ऐहिक संगीत ऐकणे आणि यादीमध्ये उल्लेख केलेल्या सर्व गोष्टी करणे सोडले पाहिजे, तुम्ही आठवड्यातून एकदा उपास केलाच पाहिजे आणि दिवसातील किमान दोन तास प्रार्थना केली पाहिजे. तुम्ही अत्यंत पवित्र जीवन जगत असल्याचे आम्हांला सिद्ध करून दाखविणे आवश्यक आहे!"

ज्युलीने लोरीच्या कानात सांगितले, "मला वाटते इश्माएलचा हा दृष्टीकोन चुकीच्या विचारातून आला आहे. त्यांचे अवास्तव नियम हे लोकांना देवाच्या कृपेची प्रशंसा करण्यापासून दूर ठेवणारे सैतानाचे एक हत्यार आहे. ह्या जळत्या बाणाला 'नियमावर बोट ठेवून चालणे' असे नाव देता येईल!"

ज्युली कुजबुजत असल्याचे इश्माएलच्या लक्षात आले आणि त्याचा आवाज वाढून झाला. "देवाच्या कृपेच्या बाबतीत आपण काळजीपूर्वक वागले पाहिजे! टीनोंच्या म्हणण्याप्रमाणे आपल्याला इतक्या झटपट प्रगती करता येणार नाही. एखादी पापी व्यक्ती ख्रिस्ती होते तेव्हा त्याने धार्मिकपणे वागून आणि ह्या यादीतील पातके करण्याचे टाळून आपली मंजूरी घेतलीच पाहिजे."

इश्माएलने व्हिक्टरला दिलेली यादी वाचण्यास लोरीने सुरुवात केली. इश्माएलने तिला सांगितले, "आमच्या विश्वासाची सर्व सिद्धांत तत्त्वे तुम्ही शिकून घेतली पाहिजेत. तसेच माझ्याकडे एकोणऐंशी धर्मसिद्धांत तत्त्वांची यादी आहे आणि अधिकृत सदस्य होण्यापूर्वी ती तत्त्वे तुम्ही शिकून घेतली पाहिजेत."

लोरीने ती यादी व्हिक्टरकडे देऊन हळूच सांगितले, "ह्या यादीतील सर्व तपशील माझ्या कधीच लक्षात राहणार नाही."

व्हिक्टरने ती यादी परत इश्माएलकडे देऊन म्हटले, "ही यादी आम्हांला ह्या गटातून बाहेर काढणार! हे आमच्यासाठी फारच आहे. मला क्षमा करा."

व्हिक्टरचे बोलणे टीनोने ऐकले आणि सौम्य शब्दांत इश्माएलची कानऊघाडणी केली, "तुम्ही ह्या विश्वासणाऱ्यांवर दडपण आणत आहात! देवाच्या दृष्टीने ती नवजात अध्यात्मिक बालके आहेत आणि केवळ काहीच परिपक्व ख्रिस्ती लोकांना साध्य करता येतात अशा गोष्टीची अपेक्षा तुम्ही त्यांच्याकडून करीत आहात. त्यांची सर्व सिद्धांत तत्त्वे शिकून होईपर्यंत आणि प्रत्येक गोष्टीत त्यांनी त्यांची परिपूर्णता सिद्ध करेपर्यंत त्यांचा स्वीकार करण्यास आपण थांबू नये. तसे केल्यास आपण त्यांना नाऊमेद केल्यासारखे होईल. अपेक्षित गोष्टींची यादी ही तुमच्या वैयक्तिक मतांवर आधारित आहे. त्याला शास्त्रलेखांचा तसा आधार नाही. व्हिक्टर आणि लोरी ह्यांना देवाच्या कृपेची खात्री मिळणे आवश्यक आहे. तीच त्यांची गरज आहे." टीनोंनी त्यांना प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकातून काही भाग वाचून दाखवला. त्यामध्ये नव्या पश्चात्ताप करणाऱ्या विश्वासणाऱ्यांना त्यांच्या तारणाची पुष्टी करण्यासाठी विनाविलंब कसा बाप्तिस्मा देण्यात आला.

इश्माएलने त्यांचे म्हणणे थोडा वेळ ऐकून घेतले आणि मग तक्रारीच्या सुरात म्हणाला, "त्याकाळात परिस्थिती खूपच वेगळी होती."

"इश्माएल" आर्जवी स्वरात टीनो म्हणाले "व्हिक्टर व लोरी ही ख्रिस्तामधील विश्वासणारी 'अर्भके' आहेत ह्याचा तुम्हांला विसर पडला काय? ते आध्यात्मिक नवजात बालके आहेत! नुकतेच जन्मलेले आहेत! तुमचा जन्म झाला तेव्हा तुम्ही चड्डीत शी-शू न करण्या इतपत मोठे होईपर्यंत आईने तुम्हांला थंडीत पावसात दाराबाहेर ठेवले नाही. त्याचप्रमाणे आपण देखील, नव्याने ख्रिस्ताकडे आलेल्यांना मंडळीरूपी शरीराच्या प्रेमळ ऊबेत लागलीच आणले पाहिजे. प्रेषितही नेहमी असेच करीत असत. शिष्यांनी अशा लोकांना कधी वाट पहायला लावली नाही. येशूवर विश्वास ठेवणाऱ्या वाईट लोकांचा शिष्यांनी स्वीकार केला. त्यांना विनाविलंब बाप्तिस्मा दिला. देवाची आधीपासून माहिती असणारे यहूदी आणि त्याच्याविषयी प्रथमच शिकणारे परराष्ट्रीय लोक अशा दोघांनाही एकाच वेळी बाप्तिस्मा देण्यात आला. नवीन विश्वासणारे ह्या नात्याने त्यांनी पहिली गोष्ट कोणती केली तर बाप्तिस्मा घेतला."

पुढे त्याच आठवड्यात पौलाने त्या तरुण दांपत्याचा बाप्तिस्मा केला त्या उभयतांना खूप आनंद झाला. परंतु इश्माएलच्या बोलण्यामुळे ते गोंधळून गेले. पुढच्या सभेत उपासना सुरू होण्यापूर्वी गटासमोर नवे सदस्य म्हणून व्हिक्टर व लोरी ह्यांची ओळख करून देण्याचा पौलाचा मानस होता; परंतु, इश्माएलने मधेच व्यत्यय आणून म्हटले, "प्रथम माझे ऐका!" तो अगदी ठाम निश्चयाने बोलत होता. "ज्या लोकांच्या जीवनांत अद्याप पाप आहे अशा लोकांना आपल्या गटाचे आधिकृत सदस्य म्हणून आपल्याला मान्यता देता येणार नाही!"

"प्रोषितांनी त्यांना स्वीकारले, इश्माएल" टीनोंनी शक्य तितक्या शांत व मधूर आवाजात दुरूस्ती केली. "नवीन विश्वासणाऱ्यांची चूक त्यांना दोष न देता कशी दुरूस्त करायची हे प्रेषितांनी आपल्याला दाखविले. विश्वासणाऱ्यांच्या आत्म्यांना जराही दोष न लावता प्रेषित पौलाने 1 करिंथ मध्ये त्यांची घोर पातके त्यांच्या लक्षात आणून दिली. चुकणाऱ्या विश्वासणाऱ्यांना त्याने मोठ्या मनाने त्यांची योग्यता काय आहे हे दाखविले ते देवाच्या कृपेने देवाचे दत्तक पुत्र असल्याची आठवण करून दिली आणि मग ते देवाचे पुत्र व ख्रिस्ताबरोबर वारीस असल्यामुळे त्याला साजेसे जीवन जगण्याचे आर्जव केले म्हणून..."

"देवाच्या राज्यात प्रवेश करण्याचा मार्ग तुम्ही सहजपणे सोपा करीत आहात!" इश्माएलने व्यत्यय आणला "ख्रिस्ती होणे ही गंभीर बाब आहे. उदाहरणार्थ शब्बाथ दिवशी काम करणाऱ्याला दगडमार करावी असा जुन्या करारातील नियम होता."

"इश्माएल, कृपा करून मला माझे बोलणे पूर्ण करू द्या." टीनोंनी विनंती केली. "नवीन ख्रिस्ती लोक चुकतात, काही चुका तर इतरांपेक्षा अधिक उघड आणि जाहीर अशा असतात. पण यासाठीच कोकरांना हळूवारपणे पुन्हा मार्गावर आणण्याकरिताच देवाने त्याच्या मंडळ्यांसाठी मेंढपाळ पाळक दिलेले आहेत. नव्या करारात बाप्तिस्मा हा वाईट लोकांसाठी आहे. या पात्रतेमध्ये व्हिक्टर व लोरी बसतात, कारण त्यांनी पश्चात्तापी अंत:करणांनी त्यांची पातके देवाजवळ कबूल केली आहेत."

"तुम्ही देवाच्या कृपेची पातळी कमी करीत आहात," टीनोंनी ठाम स्वरात उत्तर दिले. "आपण फार चांगले आहोत अशा विचाराने धार्मिक लोकांनी बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला त्यांचा बाप्तिस्मा करण्यास सांगितले, तेव्हा त्याने त्यांना 'साप' म्हटले आणि बाप्तिस्मा देण्यास नकार दिला. आपल्या दुष्ट कृत्यांची कबुली देणाऱ्यांना त्याने लगेचच बाप्तिस्मा दिला. प्रेषितांनी पश्चात्ताप करून विश्वास व्यक्त करणाऱ्या सर्वांना बाप्तिस्मा देऊन मग त्यांना शिक्षण दिले. नंतर त्यांच्या वाईट सवसींबाबत त्यांनी पवित्र आत्मा सक्रीय असणाऱ्या ख्रिस्ताच्या शरीररूपी मंडळीमध्ये निर्णय घेतले आणि त्यांची प्रेमाने आपुलकीने पाळक ह्या नात्याने काळजी घेतली, देखभाल केली बाप्तिस्म्यासाठी आम्ही नियमावर जोर ठेवून काटेकोर अटींचे पालन करण्याची अपेक्षा ठेवू नये."

"पण आता परिस्थिती बदललेली आहे! इश्माएल मुद्दा सोडायला तयार नव्हता.

"बरोबर आहे," टीनोंनी स्पष्ट केले, "समाज बदलला आहे. तंत्रज्ञान विकसीत झाले आहे, परंतु ह्यामध्ये फक्त भौतिक गोष्टींचा संबंध येतो. बाप्तिस्माशी संबंधित आध्यात्मिक वस्तुस्थिती ही न बदलणारी आहे. पाप हे नेहमीच पाप असते. कृपा ही कायम कृपाच असते. येशू सर्वकाळ सारखाच आहे. देवाच्या नवाजात कोकरांपर्यंत कृपा सहजपणे विनामूल्य घेऊन जाणे. ह्या मंडळीच्या जबाबदारीमध्ये कोणताही बदल झालेला नाही. दमास्कसच्या वाटेने जाताना शौलाला जितकी कृपेची आवश्यकता होती तितकीच आज व्हिक्टर आणि लोरीला आहे"

इश्माएलने त्या तरुण दांपत्याकडे पाहून म्हटले, "टीनोंच्या म्हणण्याशी मला देणे घेणे नाही. व्हिक्टर, तुम्ही माझ्याकडे नोकरी करता, मी सांगेल तसेच तुम्ही वागले पाहिजे!"

"ते येशूच्या आज्ञा पाळतील! टीनोने समर्थन केले." इश्माएल, कृपा करून हट्ट सोडा. येशूने करण्यास सांगितले तेच करा एवढेच आपण नवीन विश्वासणाऱ्यांना सांगतो. आपण धाकदपटशा दाखविल्यामुळे नाही तर प्रेमापोटी ते येशूच्या आज्ञा पाळतील. प्रेषितांनी नवीन विश्वासणाऱ्यांना ज्या पद्धतीने गोष्टी करण्यास सांगितले त्यापेक्षा वेगळ्याप्रकारे त्यांना काही करण्यास सांगण्याचा आपल्याला अधिकार नाही. इश्माएल, त्या उभयतांनी ख्रिस्ताऐवजी तुमचे आज्ञापालन करावे असे तुम्हांला वाटते का? त्यांनी येशूच्या मागे जाण्याऐवजी तुमच्या पावलांवर पाऊल टाकावे आणि येशू व त्याच्या शिष्यांच्या आज्ञा बाजूला ठेवून तुमच्या नियमांचे पालन करावे अशी तुमची इच्छा आहे का?"

इश्माएल म्हणाले, "मी एका पाहुण्यांशी तुमची ओळख करून देतो." चर्चेला सुरुवात झाल्यावर काही क्षणातच एक माणूस तिथे आला. व्हिक्टर व लोरीने त्या माणसाला यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. इश्माएल पुढे म्हणाले" ह्यांचे नाव आर्थर, हे अतिशय आवेशी धार्मिक दृष्ट्या उत्साही आहेत. हे टॅक्सी चालक आहेत. रात्री आपण सर्व झोपलेले असतो तेव्हा हे टॅक्सी चालविण्याचा व्यवसाय करतात. दिवसभर ते प्रभुची सेवा करतात त्यामुळे ते कधी झोपतात हे काही मला ठाऊक नाही!"

इतरांनी आर्थरचे स्वागत केले. मग इश्माएलनी त्याला विचारले, "आर्थर, आमच्या चर्चेविषयी तुमचे काय मत आहे?"

"आठवड्यातून एकदा उपास करणे हे तुमचे म्हणणे मला आवडले. तुमच्या यादीत आणखी भर येतील अशा आणखी गोष्टी माझ्याकडे आहेत. कडक नियमांचे पालन करणारा गट अधिक धार्मिक असतो! आणि हो नवीन सदस्य प्रामाणिक असल्याची खात्री करून घ्या!"

टीनोंनी आर्जवी स्वरात म्हटले, "अनेक नियम लादण्याची तुमची इच्छा आपल्याला जुन्या कराराच्या नियमशास्त्राकडे घेऊन जाणार" व्हिक्टर व लोरी ह्यांचे चिंतेने व्याकूळ झालेले चेहरे पाहून ते पुढे म्हणाले, "आपण ही चर्चा आता येथेच थांबवूया!"

आर्थरने तिकडे दुर्लक्ष केले आणि खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीने केल्या पाहिजेत असे त्याचे म्हणणे आहे अशा आणखी काही गोष्टी व्हिक्टरला सांगितल्या. मग "जुन्या करारातील काही नियम पाळण्यात काय चूक आहे?" असा प्रश्न आर्थरने टीनोंना विचारला.

"चूक इतकीच आहे की तुमचा दृष्टीकोन जुन्या कराराचा आहे. त्याच्या नियमशास्त्रानुसार मनुष्याने त्याच्या स्वतःच्या कर्माद्वारे देवाची मान्यता मंजुरी मिळविण्याचा प्रयत्न केला. नवा करार ज्यावर ख्रिस्ताने आपल्या रक्ताने मोहोर उमटवली तो विश्वासाच्या द्वारे कृपा देऊ करतो. देव आपल्या कृपेने पुनरूत्थित ख्रिस्ताच्या द्वारे आम्हांला आपल्या हातात ठेवतो. आमच्या प्रयत्नांतून हे घडत नाही. इफिस अध्याय एक व्हिक्टर व लोरी सारख्या नव्या विश्वासणाऱ्यांना खात्री देतो की त्यांना विपुल दया, प्रीती व शांतीचा आनंद लुटता येईल"

"होय, अर्थातच् माझ्या सर्व सदस्यांनी आपल्या उत्पन्नाच्या दशांशापेक्षा अधिक दान दिले पाहिजे त्यांनी देवाच्या कार्याला पाठबळ दिले पाहिजे. त्यांच्या पैशातून आपल्याला काय करता येईल याचा विचार करा.

माझ्या लोकांनी एक महागामोलाचे सुंदर पुलपीट आणले. होय! आता या गोष्टी आपल्याला घेता येणे शक्य आहे. मी सर्व विश्वासणाऱ्यांना अधिक देण्यास प्रवृत्त केले. होय! होय! त्यांच्याकडे देव आहे हे त्यांना सिद्ध करण्यास प्रवृत केले!"

लोरी हळूच व्हिक्टरच्या कानात कुजबुजली, "आर्थरचे डोळे मला घुबडासारखे वाटतात!"

टॅक्सी चालक अतिशय वेगाने बोलत होता. वाक्यांच्या मध्ये ओठांवरून जीभ फिरविण्यास फक्त तो थांबत होता. मशीन गनमधून गोळ्या सुटाव्यात तसे त्याचे शब्द येत होते. तो सतत इकडे तिकडे नजर फिरवीत होता. जणू काही एकाच वेळी सगळीकडे बघण्याचा किंवा कोणापसून तरी सुटका करून घेण्याचा त्याचा प्रयत्न होता. तथापि, तो एकेका व्यक्तीशी बोलताना एखाद्या पुतळ्यासारखा उभा राहात असे आणि जणू काही सावजावर झडप घालणाऱ्या वाघासारखे एकटक त्यांच्या डोळ्यांत पाहात असे.

चर्चा करून झाल्यावर ते काय काय शिकले, कार्यक्रम कोणते ठरवायचे तसेच एकमेकांसाठी प्रार्थना करण्याकरिता लहान लहान गट करून बसले. टीनो, व्हिक्टर व लोरी ह्यांच्याबरोबर बसले. व्हिक्टरने त्यांना विचारले, "मर्जी जिंकण्यासाठी आम्ही इश्माएल आर्थर ह्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी करण्याची आवश्यकता नाही असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ आहे का?"

"व्हिक्टर, आपल्या सत्कृत्यांनी देवाला नेहमीच आनंद होतो. आता येथे केलेल्या तुमच्या चांगल्या कृत्यांचे प्रतिफळ तो तुम्हांला स्वर्गात देईल. परंतु, आमच्या सत्कृत्यांनी आमचे तारण होत नाही. केवळ ख्रिस्तच आमचे तारण करतो, याकरिता तो आम्हांला विश्वासाच्याद्वारे त्याचे मरण आणि पुनरुत्थान यामध्ये सहभागी करून घेतो. देवाला संतोष देण्यासाठी चांगली कार्ये आवश्यक आहे, परंतु आमच्यामध्ये कार्य करणारे देवाचे तारण आणि त्याचे पालट करणारे सामर्थ्य यामुळेच फक्त हे शक्य होते."

दुसऱ्या दिवशी टीनोंनी व्हिक्टर व लोरी ह्यांची भेट घेतली. त्यांना सांगितले, "काल देवाच्या कृपेच्या संबंधात तुम्हांला आमचा वाद ऐकावा लागला याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. सर्वश्रेष्ठ आणि परिपूर्ण पवित्र देवाने तुम्हांला क्षमा केलेली आहे, देवाचे वचन तशी खात्री देते. तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने तुमच्यामध्ये त्याचे पालट करणारे कार्य करण्यास सुरुवात केली आहे. तो तुम्हांला आपल्या हाती सुरक्षित ठेवतो आणि हे सर्वकाळसाठी आहे. येशूने स्वतःच तसे योहान अध्याय 10 मध्ये सांगितले आहे."

व्हिक्टरनी शेरा मारला "लोरी व मी आम्हांला देवाची कृपा मिळालेली आहे, अशी इश्माएलची खात्री झालेली नाही. इश्माएल व आर्थर यांच्यासारखे परिपक्व विश्वासणारे व वडीलजन ह्यांनाच शंका वाटते तर लोरीची व माझी खात्री कशी काय पटणार?"

"म्हणूनच तर मी मुद्दाम तुम्हांला भेटायला आलो कालच मी आमच्या विभागीय मंडळ्यांच्या वडीलजनांशी बोलले. बाप्तिस्मा घेणे आणि ख्रिस्ताच्या शरीररूपी स्थानिक मंडळीची मान्यता मिळविण्यासाठी तुम्ही मानवनिर्मित अनेक गरजा पूर्ण केल्या पाहिजेत, अशी अपेक्षा करणे चूक आहे, हे त्यांनाही मान्य नाही. आपण सर्वजण मिळून रोमकरांस पत्राचा आठवा अध्याय वाचू या, आणि देवाच्या कृपेच्या खात्रीविषयी समजून घेऊ या. तुमच्यापैकी कोणी वाचणार का?"

व्हिक्टरनी रोम ८ हा आध्याय मोठ्याने वाचला ख्रिस्तामधील विश्वासणाऱ्यांना देवाच्या सार्वकालिक प्रीतीपासून वेगळे करणे अशक्य आहे, हे व्हिक्टर वाचत असताना लोरीला रडू कोसळले.

"यालाच पुन्हा पटविणे असे म्हणता येईल!" वाचून झाल्यावर व्हिक्टरने उद्‌गार काढले. "इश्माएल व आर्थरचे बोलणे ऐकून आम्ही दोघेही पार निराश होऊन गेलो होतो. त्यांचे म्हणणे ऐकून पोटात गोळाच आला होता. आमच्याबद्दल इतक्या लवकर शंका वाटावी हे आम्हांला कसे पटेल?"

"सैतानाच्या एका जळत्या बाणाने तुमच्यावर हल्ला करण्यात आला होता,'' टीनो म्हणाले.

लोरीला आठवले, "जुलीने सांगितले होते की अशा बाणांना 'नियमावर बोट ठेवून चालणे' असे म्हणतात

हे दु:ख कारक वेदनादायी होते! यापासून काही संरक्षण नाही का, दादा?"

"सर्वसमर्थ रक्षण करतो, आपण फक्त विश्वासाची ढाल घट्ट धरून ठाम राहिले पाहिजे. त्या विश्वासाचा उपयोग करून दुष्टाचे जळते बाण थांबविले पाहिजे. देवाने तशी आम्हांला सूचनाच दिलेली आहे."

"त्याबद्दल आपल्याला वाचता येईला?" व्हिक्टरने विनंती केली.

"हो, आपल्याला सैतानाच्या विरुद्ध वापरता येईल अशा देवाच्या शस्त्रसामग्री विषयी इफिस 6:10-19 ह्या वचनांमध्ये सांगितलेले आहे."

ही वचने वाचून झाल्यावर व्हिक्टर आश्चर्याने उद्गारले, "आम्हांला एवढे वाईट का वाटले ते मला आता समजले. सैतानाच्या जळत्या बाणांनी आमचे आत्मे जखमी झाले होते!"

"फक्त तुम्ही दोघेच नाही तर इश्माएल व आर्थर ह्या आमच्या दोघा बंधूनांही दीर्घ काळपर्यंत नियमशास्त्राचे काटेकोर पालन करण्याच्या बाणाची विषबाधा झालेली होती."

लोरीने क्षणभर आपले डोळे बंद करून म्हटले "अशी कल्पना करा!" "समजा काल आपण देवदूतांच्या डोळ्यांनी पाहिले असते तर धनुष्य बाण घेऊन सज्ज झालेला सैतान आपल्याला दिसला असता. नियमशास्त्रानुसार वर्तन करण्याचे बाण तो आमच्यावर सोडत असताना आम्हांला दिसला असता."

येशूने आम्हांला नियमशास्त्रानुसार वर्तनापासून सावध राहण्याचा इशारा दिलेला आहे," टोनींनी उत्तर दिले. "हा परूश्यांचा विषाणू आहे." "येशूने देवाची विनामूल्य कृपा पापी लोकांना देऊ केली तेव्हा ह्याच परूश्यांनी त्याला विरोध केला. ते धार्मिक लोक होते. आपल्याला चुकीचा सल्ला देणाऱ्या इश्माएल मित्राप्रमाणेच परूश्यांनीही परिपूर्णतेची अपेक्षा ठेवली. आपण आपल्या विश्वासाच्या ढालींचा उपयोग करू या!"

## अभ्यास

देव विश्वासणाऱ्यांवर प्रीती करतो त्यांचा स्वीकार करून त्यांना क्षमा करतो. ह्यांची त्यांना खात्री देण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता?

त्यांना देवाचे वचन आणि त्याची प्रीती यावर भरवसा ठेवण्यास शिकवा

त्यांना अनेक कडक नियम पाळण्यास बंधन घाला.

[उत्तर कलस्सै 2:20 ते 3:1 मध्ये शोधा]

येशूचे आज्ञापालन विश्वासणाऱ्याने करण्याचा सर्वोत्तम दृष्टीकोन कोणता?

प्रीती

भय

[उत्तर योहान 14:15 मध्ये पाहा.]

देवाच्या कृपेची प्रशंसा करण्यासाठी तुमच्या मंडळीतील विश्वासणाऱ्यांना साहाय्य करण्याकरिता तुमची योजना स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------.

## प्रकरण 3

## व्हिक्टर व लोरीने जुनाट सर्पाचा प्रतिकार केला

## ( श्वासातून अग्नी टाकणारा पंखवाला साप, सैतान )

ट्वांग!

व्हिक्टर व लोरीला दिसला नाही पण मनुष्याच्या शत्रूने आणखी 'भय' नावाचा बाण त्यांच्यावर सोडला.

ट्वांग!

दुसरे क्षेपणास्त्र आले याचे नाव 'अविश्वास'

विरोधकाने पुन्हा इश्माएल व आर्थरवर नेम धरला. ट्वांग! ट्वांग! 'संसाराविषयी आसक्ती' आणि 'बुद्धिप्रामाण्यवाद' हे दोन जळते बाण पृथ्वीच्या दिशेने आले.

सर्व दुष्ट आल्यांच्या प्रमुखाने विकट हास्य करून आपल्या सहाय्यक भुतांना आज्ञा केली, "सर्वापेक्षा अधिक तप्त असे क्षेपणास्त्र आणा. आपण ते आत्ताच सोडू!"

एका भुताने क्षेपणास्त्र पेटविले आणि सैतानाने नेम धरला. ट्वांग! 'सत्तेची हाव' हे क्षेपणास्त्र टीनोंच्या गटाच्या दिशेने झेपावले.

"लवकरच देवाच्या कृपेचा प्रवाह खंडीत होईल!" भुतांच्या नायकाने फुशारकी मारली.

पुढच्या सभेमध्ये सर्वजण उपकारस्तुती करण्याची वाट पाहात असताना इश्माएलने घोषणा केली. "माझ्याकडे एक चांगली बातमी आहे. आर्थर एका गटाचे नेतृत्व करीत होते. आता ते तो गट सोडून आपल्या गटात सामील होणार आहेत. ते अनुभवी आहेत आणि कडक शिस्त कशी राखावी हे त्यांना ठाऊक आहे"

"तुझे घुबड बघ!" व्हिक्टर हलकेच लोरीच्या कानात कुजबूजला. तिला हसू आले म्हणून तिने आपले तोंड झाकून घेतले.

टीनोंनी आर्थरला विचारले "तुम्ही तुमचा गट का सोडून दिला?"

"ते धार्मिक नाहीत. त्यांचा पुढारी ह्या नात्याने ज्या गोष्टी मी त्यांना करण्यास सांगतो. त्या करण्यास ते तयार नाहीत. म्हणून त्यांच्या साहभागितेतून दूर होणे हे माझे कर्तव्यच होते. हो, ते खरे ख्रिस्ती नाहीतच." ते एकाएकी वळून टीनोंशी बोलू लागले.

"वाघाने झेप घेतली!" लोरीने व्हिक्टरच्या कानात हळूच सांगितले आणि गालातल्या गालात हसली.

संपूर्ण सभेमध्ये जमेल तेव्हा इश्माएल व आर्थर बोलत होते. टीनोंचा स्वत:वरचा ताबा सुटत चालल्यासारखे वाटत होते. लोकांनी प्रभुभोजनाच्या विधीची तयारी केली तेव्हा इश्माएलने नवीन विश्वासणाऱ्यांना सल्ला दिला, "तुम्ही ह्या गेल्या आठवड्यात काही पाप केले असेल तर तुम्हांला प्रभुभोजन घेता येणार नाही."

आर्थरनेही भर दिला, "तुम्ही नवीन विश्वासणाऱ्यांनी काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. प्रभुभोजनामध्ये देव काही विशेष खास असे करीत नाही. यात काही रहस्य नाही. येशू मरण पावला याची आम्हांला आठवण करून देण्याचे हे फक्त एक दृष्य साधन आहे. पवित्र आत्मा कोणतेही अलौकिक कृत्य करीत नाही. भाकरी हा केवळ येशूच्या शरीराचे प्रतिनिधित्व करते. होय, हे आम्हांला आठवण करून देणारे फक्त एक दृष्य साधन आहे, यापेक्षा अधिक काही नाही. हे येशूचे शरीर आहे असे तुमच्या तोंडून ऐकायला मला आवडणार नाही हे फक्त येशूच्या शरीराचे प्रतिक आहे."

टीनोंनी यावर प्रतिक्रिया दिली "प्रभुभोजनाविषयी आर्थरने आत्ताच जे काही सांगितले ते त्यांचे मत आहे. या पवित्र विधीमध्ये खरोखर काही रहस्य आहे यावर माझा विश्वास आहे, हे तुम्हांला सर्वांना समजावे अशी माझी इच्छा आहे," आर्थरने वाद घालण्यास सुरुवात केली पण टीनोंनी त्याला सांगितले, "यावर आपण आत्ता

काहीही बोलणार नाही. आपण येथे उपासना करण्यासाठी आलो आहोत याविषयी तुम्हांला काही बोलायचे असेल तर आपण नंतर थांबून बोलू."

काही दिवसांनी टीनो व ज्युली पुन्हा व्हिक्टर व लोरीला भेटण्यास गेले. व्हिक्टर व लोरीचा बाप्तिस्मा झाला होता आणि ख्रिस्तामध्ये नव्या विश्वासात त्यांची वेगाने वाढ होत होती. टीनो व व्हिक्टर बाहेर बोलत बसलेले असताना ज्युली आत स्वयंपाक घरात लोरीकडे गेली. ज्युलीने विचारले, "लोरी, तू फार त्रासलेली दिसतेस."

"मला आज निराश वाटतं खर, ज्युली. येशूचा मी अगदी प्रथम स्वीकार केला तेव्हासारखा आनंद मला आता वाटत नाही. कृपेची नदी माझ्यासाठी आटून सुकून गेली असे वाटते. माझ्या हातून काही वाईट गोष्टी घडल्या आहेत. मी व्हिक्टरशी वाद घातला. खरे, म्हणजे मी त्याच्या अधीन असायला हवे होते. मी अगदी आडमुठेपणाने वागले. ज्युली, तुझ्यासारखे छान छान मला वागता येत नाही. मी अगदी कुचकामी अपयशी अशी आहे!"

"असे नाही, लोरी! तू नवीन विश्वासणारी ख्रिस्तातील आध्यात्मिक मूल आहेस अशा प्रकारच्या अपयशाचा अनुभव आम्ही सर्वांनीच घेतलेला आहे."

"देवाने खरोखरच आमचे तारण केले आहे का? इश्माएल व आर्थरचे बोलणे ऐकून आम्ही दोघेही फार निराश होऊन गेलो. त्यांनी खूपच अधिक अपेक्षा केल्या! देवाची कृपा मिळण्यास आम्ही पात्र योग्य आहोत की नाही याचीच चिंता आता व्हिक्टरला वाटते."

"लोरी, कृपा मिळविण्यास आपल्यापैकी कोणीच पात्र लायक नाही," ज्युलीने तिला आठवण करून दिली. "तुझ्या ठायी राहणारा पवित्र आत्मा तुला देवाची सर्व कृपा देतो, कृपा नेहमीच तुमच्यासाठी आहे. देव आम्हांला त्याची समक्षता व कृपा ह्यांची खात्री देणाऱ्या गोष्टी आम्ही फक्त आपल्याशा केल्या पाहिजेत."

"कोणत्या गोष्टी, ज्युली? आपल्याला इतकी लाज वाटत असताना देवाच्या कृपेविषयी आम्ही खात्री कशी बाळगावी?"

"याविषयी आपण टीनोला विचारूया. देवाच्या वचनातून लोकांना प्रोत्साहन द्यायला त्याला खूप आवडते."

त्या टीनो व व्हिक्टरच्या बोलण्यात सामील झाल्या. मग ज्युलीने सुचविले, "टीनो, आपल्याला देवाची कृपा मिळाली आहे, याची आम्ही खात्री का बाळगावी हे कृपा करून समजून सांगा."

"देव आपल्या मुलांना आनंद, शांती आणि इतर ख्रिस्ती सद्‌गुण देतो," टीनोंनी उत्तर दिले, "ही कृपा त्याच्यापासून अनेक मार्गांनी येते. ती त्याच्या वचनातून मिळते. तसेच देवाच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आपण एकमेकांची सेवा करतो, तेव्हा त्याचे कार्य आमच्या अंतःकरणांत होते. त्यातून कृपा मिळते. तसेच बाप्तिस्मा प्रार्थना आणि प्रभुभोजन याद्वारेही कृपा मिळते."

"व्हिक्टरने आणि मी देवाच्या वचनाचा अभ्यास करून प्रार्थना केली," लोरीने सांगितले, "आमचा बाप्तिस्मा झाला आणि प्रभुभोजनामध्ये सहभागी झालो, तसेच इतरांची सेवा करण्याची आमची निश्चित इच्छा आहे. परंतु मी केलेल्या अनेक वाईट गोष्टींची मला अद्यापही लाज आणि भीती वाटते."

"सैतान त्याचे जळते बाण पुन्हा तुझ्या दिशेने फेकत आहे, लोरी, तो तुझ्या मनात संशयाचे, शंकेचे विष भरायचा प्रयत्न करीत आहे. अनेक नवीन विश्वासणाऱ्यांचा सुरुवातीचा आनंद कमी झाला की त्यांच्याबाबतीत हे असेच घडते. आपण आपल्या भावनांवर भरवंसा ठेवू नये."

"आर्थरचे बोलणे ऐकल्यापासून तर माझ्या मनात शंकांचे नुसते मोहोळ उठले आहे, असे का ते मला ठाऊक नाही," व्हिक्टरने त्याच्या मनातील विचार सांगितले.

"आर्थरच्या म्हणण्याचा अर्थ चांगला आहे, पण तो बुद्धिप्रामाण्यवादी आहे टीनोंनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला." "बुद्धिप्रामाण्यवादी म्हणजे काय?"

"ख्रिस्ती बुद्धिप्रामाण्यावादी देवाच्या वचनाचे विश्लेषण आपल्या मानवी विचारशक्तीने करतो. त्यांना असे वाटते की कशावरही विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांना काहीतरी पूर्णपणे समजले पाहिजे; परंतु मानवी विचार शक्तीच्या द्वारे कोणत्याही मनुष्याला देवाची कृपा समजून घेता येत नाही, पूर्णपणे कळत नाही. कृपा ही तर्काने कळत नाही. तर दुसऱ्या बाजूला न्याय हा तर्कसंगत आहे. तर्कसंगतीने दया काय आहे हे एकवेळ समजून घेता येते; पण कृपा की सर्व मानवी विचारशक्तीच्या पलीकडची आहे. कारण ती नेहमीच लायकी पात्रता नसताना मिळत असते. आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावर लोक थुंकले, त्याचा अपमान केला, चपडाका मारल्या आणि त्याला वधस्तंभावर खिळले; तेव्हा त्याला पराकोटीचे दु:ख देणाऱ्यांना त्याने प्रेमळ क्षमेनेच उत्तर दिले. हीच परिपूर्ण कृपा व्हिक्टर आणि मानवी समजबुद्धी विचारशक्तीला तिचे आकलन होत नाही."

"म्हणूनच प्रभुभोजनामध्ये काहीही रहस्य नाही असे आर्थरने सांगितले का?" व्हिक्टरने प्रश्न केला, "खरे म्हणजे याचीच मला जास्त चुटपुट लागली आहे, आपण ख्रिस्ताच्या शरीरात सहभागी होतो असे 1 करिंथ 10:16 हे वचन सांगते. हेच माझ्याकरिता रहस्य आहे."

"हे अतिशय मोलवान आहे!" लोरी उद्‌गारली.

"हे खरोखर दैवी रहस्य आहे," टीनोंनी पुष्टी दिली, "देव ही बाब अत्यंत गंभीरपणे घेतो प्रभुभोजन घेताना ख्रिस्ताच्या शरीराचे मर्म ओळखण्यात अपयशी ठरलेल्या विश्वासणाऱ्यांना तो शिक्षा करतो असे 1 करींथ 11 मध्ये सांगितले आहे. तथापि, आर्थर याचे स्पष्टीकरण बुद्धिवादी परिभाषेत करतो, यात काही अलौकिक कार्य आहे हेच मुळी तो नाकारतो. त्याला वाटते की आपण एकत्र येऊन भाकरी मोडतो तेव्हा पवित्र आत्मा सुट्टीवर जातो! मी सुद्धा एकदा अशाच प्रकारे विचार केला होता; पण माझ्या शंका संशयाबद्दल मी देवाकडे क्षमा मागितली आणि त्याने माझी क्षमा केली. लोरी, मी माझ्या स्वत:च्या संशयवादाविषयी शंका घ्यायला शिकलो."

"तुम्ही कशाला रहस्य म्हणाल?" व्हिक्टरनी प्रश्न केला.

"भाकरी हे ख्रिस्ताचे शरीर 'आहे' असे येशू व प्रेषित पौल ह्या दोघांनीही सांगितले आहे. हे त्याच्या शरीराचे 'प्रतिनिधित्व' करते असे काही त्यांनी सांगितले नाही, भाकरी ही भाकरीच राहते; परंतु खरोखर आध्यात्मिक दृष्टीने ते ख्रिस्ताचे शरीरही आहे. कदाचित् याला प्रतिक म्हणता येईल, पण हे प्रतिक आपण विश्वासाने मिळविले तर ते ज्याचे प्रतिक आहे त्या वास्तव प्रत्यक्षातील गोष्टीचे सामर्थ्य धारण करते."

"प्रभुभोजन घेताना मला देवाने कार्य केल्याचे जाणवले," व्हिक्टरने आठवून सांगितले, "ख्रिस्त खरोखर तिथे उपस्थित आहे असे मला जाणवले. त्याचे कारण मला आता समजले; पण मला आणखी एक प्रश्न पडला आहे. मंडळीच्या तिजोरीतील निधीमध्ये भर घालण्यासाठी इश्माएलाचा मित्र आर्थर लोकांना सांगत होता आणि त्याने सांगितलेल्या इतर गोष्टींनी मला अपराधी वाटू लागले. तुम्ही व आर्थर दोघांनीही पवित्र शास्त्राचा उपयोग केला पण तुमच्या बोलण्याने आम्हांला अपराधी वाटले नाही हा असा फरक कशामुळे घडला?"

"मला वाटते टीनो, आर्थर हा सांसाराविषयी आसक्ती असणारा आहे. तो लोकांच्या जीवनातील देवाच्या कृपेचे मोजमाप त्यांच्याकडे असणाऱ्या सांसारिक गोष्टींवरून करतो. मंडळीकडे स्वत:च्या मालकीची काही मालमत्ता असेल तरच ती यशस्वी असते असाही त्याचा विचार आहे. पूर्वी त्याच्याच गटाचा सदस्य होतो. प्रभुची सेवा कशा प्रकारे करावी यबद्दल इतर सदस्यांनी सुचविलेल्या नव्या कल्पनांकडे त्याने पूर्णत: दुर्लक्ष केले, अशा कल्पनांचे प्रकल्प राबवले, तर मंडळीचा पैसा वाया जाईल असे त्याला वाटायचे. पण त्या प्रकल्पांना काहीही खर्च माझ्या मते येणार नव्हता. आपण त्याच्यासाठी व इश्माएलकरिता प्रार्थना केली पाहिजे. मला वाटते त्यांचा हेतू चांगला असतो पण ते त्यामध्ये जगाला त्याच्या कल्पनांसह हस्तक्षेप करण्यास वाव देतात. केव्हा केव्हा चांगल्या ख्रिस्ती लोकांनाही देवाऐवजी मनुष्य आणि सैतान-भुते याच्या पासूनच कल्पना सुचतात."

एक महिन्यानंतर टीनोंची भेट अनेक लहान-लहान गटांच्या पाळकीय देखभाल करणाऱ्या वडीलजनांशी झाली. तेथे काय काय कार्यक्रम असतो तो पाहण्यासाठी त्यांनी व्हिक्टरलाही सोबत नेले. सभेच्या दरम्यान टीनोने सुचवले, "मी ज्या गटाचे पुढारीपण करतो तो आता खूप मोठा झालेला आहे आणि त्याची देखभाल करणे अवघड पडते. या गटाचे किमान दोन नवे गट स्थापन करण्याची माझी इच्छा आहे. त्यापैकी एक गट व्हिक्टर व लोरीच्या घरी एकत्र जमेल. त्यांची ख्रिस्तामध्ये चांगली वाढ होत आहे आणि ते लवकरच गटाचे पुढारीपण करण्यास सक्षम होतील. ज्युली व मी त्यांना मार्गदर्शन करू."

"यामुळे फूट पडेल टीनो!" भावनाविवश होऊन इश्माएल म्हणाला, आपण नवीन विश्वासणाऱ्यांना गृह गटांचे पुढारीपण करण्यास दिले तर त्यामुळे शरीररूपी मंडळीत नक्कीच फूट पडेल."

आर्थरने भर घातली, "टीनो तुमच्यासारख्या सर्जनशील विचारांच्या लोकांवर माझा विश्वास नाही, त्यांना नेहमीच काहीतरी नवीन नवीन सुरू करायचे असते. गृह गटांवर आपले कडक नियंत्रण असले पाहिजे. त्यासाठी कडक नियम असावेत. होय! गृह गटांना ते सर्व लहान लहान मंडळ्या आहेत असे समजून आपल्याला वागू देता येणार नाही. असे केले तर त्यांना पुष्कळ स्वातंत्र्य दिल्यासारखे होईल. त्या सर्वांनी इश्माएलनी तयार केलेला अभ्यासक्रमच वापरला पाहिजे. त्यांनी फक्त पवित्र शास्त्र अभ्यास गट म्हणूनच राहिले पाहिजे."

"आर्थर कृपा करा!" टीनो आर्जवी स्वरात म्हणाले "आपल्या गटांवर असे निर्बंध घातल्याने त्यांच्या ठायी देव करीत असलेले कार्य नष्ट होईल. पवित्र शास्त्राच्या अभ्यासापेक्षा देवाला आणखी काही गोष्टींची आवश्यकता आहे. माझ्या गटामध्ये प्रभूची आणि एकमेकांची सेवा करण्यासाठी सर्व प्रकारचे कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. नव्या करारातही विश्वासणाऱ्यांच्या गटाकडून अशीच अपेक्षा केली आहे. तुम्ही सांगितलेला अभ्यासक्रम शिकविला तर मग आपल्या गटांमधील विश्वासणाऱ्यांच्या सध्याच्या गरजांना अनुरूप असे अभ्यासक्रम आपल्याला निवडता येणार नाहीत."

चर्चेमध्ये काही काळ शांतता पसरली. त्या दरम्यानच्या काळात व्हिक्टरने टीनोंना विचारले, "मार्गदर्शक तत्त्वांसाठी आम्ही नवा करार वापरतो असे तुम्ही का म्हणाला? आपण जुना करारही वापरत नाही का?"

"आम्ही अन्य काही हेतूंसाठी जुना करार वापरतो. परंतु नव्या करारातील मंडळीचा कार्यक्रम ठरविण्यासाठी ते वापरत नाही. अन्यथा शनिवारी जळणासाठी लाकूड गोळा करणाऱ्या लोकांना दगडमार करून जिवे मारावे लागले असते." ख्रिस्ताने आणि त्याच्या शिष्यांनी आमच्यासाठी नेमून दिलेली सर्व कामे, कार्यकृती आम्ही करणे अगत्याचे आहे."

टीनोंचे बोलणे एकून आर्थरने मत मांडले, "आपण सर्व कार्यक्रम निश्‍चितच करू! होय! निरनिराळ्या गरजा पूर्ण करणारी सेवाकार्ये करण्याकरिता आपण लोकांची नेमणूक करू. एक गट प्रत्येक सेवाकार्य करील. प्रत्येक गटाला एक सेवाकार्य असेल आणि तो तेच करील! होय! सर्व गट वचनाचे शिक्षण देतील. तथापि, एकच गट सुवार्ता प्रसाराच्या कार्यावर नियंत्रण ठेवील दुसरा गट उपासना घेईल. आणखी एक गट आर्थिक व्यवहार सांभाळून दान देण्यास प्रोत्साहन देईल. अशा प्रकारे आपल्याला सर्व गटांवर नियंत्रण ठेवता येईल. प्रत्येकजण काय करीत आहे, हे आपल्याला समजेल," आर्थरने आपला आवाज वाढवला आणि इतर सर्व वडीलजन त्याचे व टीनोंचे बोलणे ऐकत होते.

"अशा प्रकारच्या विशेष संघटना शास्त्रलेखाच्या अपेक्षांना विरोध करतात!" टीनोंनी इशारा दिला. "तुम्ही लोकांना लहान लहान कप्प्यांमध्ये बंदिस्त करून ठेवत आहात! देव मंडळीरूपी शरीराला देत असलेली निरनिराळी आध्यात्मिक दाने तुम्ही वेगवेगळी करणार! कृपादान असलेल्या लोकांचा लाभ इतर विश्वासणाऱ्यांना करून देण्याऐवजी तुम्ही त्या लोकांना एकाच गटात एकवट करणार. लहान गटांमध्ये विश्वासणाऱ्यांनी निरनिराळ्या मार्गांनी एकमेकांची सेवा केली पाहिजे, त्यामध्ये तुमची ही पद्धत कोणताही ताळमेळ घालत नाही. देवाचे वचन सांगते की, प्रत्येक गटांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या सेवाकार्यसाठी विविध प्रकारची कृपादाने असलेले लोक असावेत म्हणजे त्यांना एकमेकांची सेवा करता येईल."

"मला हे मान्य नाही!" आर्थरने तोफ डागली, "वेगळे कार्यक्रम आयोजित करून आपल्याला गटांवर नियंत्रण ठेवता येईल. होय! हाच एक मार्ग आहे." इतर दोन वडीलजन आर्थरला सहमती दर्शवत पुटपुटले.

टीनोंच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती. त्यांनी आर्जव केले, "कृपा करून पवित्र शास्त्रातील मार्गाने अधिक विचार करा. ख्रिस्ताच्या शरीराचे नियोजन करण्यासाठी निरनिराळी आध्यात्मिक कृपादाने असलेल्या लोकांना वेगळे करून नव्हे तर एकत्र आणून त्यांच्या कार्याचा योग्य मेळ आपण घालावा अशी देवाची अपेक्षा आहे. 1 करिंथ 12, रोम 12 आणि इफिस 4:11-16 शास्त्रभाग वाचा एकाच शरीरामध्ये आमच्या विविध सेवाकार्याच्याद्वारे आम्ही एकमेकांची प्रीतीने सेवा करणे अगत्याचे आहे. आपले लहान लहान गृह गट हे कार्य अगदी उत्तमरित्या पार पाडत आहेत. आपल्याला पवित्र शास्त्रानुसार असलेले कामकाज बंद करण्याची आवश्यकता नाही."

"तुम्हांला प्रत्येक गटाची एक लहान मंडळी करायची आहे!" आर्थरने तक्रारीच्या सुरात मोठ्याने म्हटले "अशा गटांवर नियंत्रण ठेवणे आपल्याला कठीण जाईल होय! आपल्या सारख्या पुढाऱ्यांना अधिक सामर्थ्य देईल अशा प्रकारच्या संघटनेची आपल्याला गरज आहे."

"आर्थर तुम्हांला तुमच्या सामर्थ्याची फारच काळजी आहे. प्रत्येक गटावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यावर भरवंसा ठेवणे अधिक योग्य होईल आणि देव प्रेरणा देईल त्यानुसार प्रत्येक गटाला आपआपल्या सेवाकार्याचा विकास करू द्या. आत्म्यामधील अशा प्रकारच्या स्वतंत्र्याचे अभिवचन 2 करिंथ 3:17हे वचन आपल्याला देते."

"तुम्हांला नव्या नव्या गोष्टींची ओळख करून द्यायला आवडते, टीनो," आर्थरने त्याचे म्हणणे पुढे रेटले, "तुमच्या गटातील प्रत्येकाला तुम्ही काहीतरी नवे प्रयोग करायला परवानगी देता एका आठवड्यापासून पुढच्या आठवड्यापर्यंत काय होईल हे कोणालाच ठाऊक नसते इतके स्वातंत्र्य गोंधळ उडवून देते. त्यामुळे आमच्या ऐक्याला बाधा येते सर्व गटांसाठी आपल्याला एकच प्रमाणित आचरण पद्धतीची आवश्यकता आहे. तसेच प्रत्येक गटीतील प्रत्येकाकरिताही एकच आचरण पद्धत असावी! होय! अशाच प्रकारे ऐक्य राखता येते!"

"ऐक्याचा मेळ एकसमानतेशी लावून आपण गोंधळ उडवायला नको" टीनोंनी आर्जव केले. "ख्रिस्तामधील खरे ऐक्य म्हणजे प्रत्येकाने एकच कार्य केले पाहिजे असा याचा अर्थ नाही. याचा अर्थ नेमका उलट आहे! प्रेषितांनी आध्यात्मिक कृपादानांवार विचार करताना शरीरामधील ऐक्यतेविषयी शिक्षण दिले. त्यांनी स्पष्ट केले की ख्रिस्तामधील ऐक्य म्हणजे आपल्या सर्वांना निरनिराळी कृपादाने मिळणे आणि पवित्र आत्मा आपल्या प्रतीतीमधील विविध सेवाकार्याचा योग्य ताळमेळ घालतो."

आधी आर्थरच्या मताशी सहमती दर्शविणारे एक वडील बोलले, "हे सत्य तर महत्वपूर्ण वाटते, टीनो. भाऊ, यापूर्वी मी याकडे कधीच लक्ष दिले नव्हते. बरोबर आहे! 1 करिंथ 12 मध्ये याबद्दल स्पष्टपणे शिकवले आहे. आपल्या शरीरातील निरनिराळे अवयव जसे एकत्रितपणे कार्य करतात त्याचप्रकारे देवाचा पवित्र आत्मा विविध प्रकारच्या सेवाकार्यामध्ये योग्य ताळमेळ साधतो. टीनो, तुमचे खूप खूप आभार मानतो. सेवा करण्याच्या निरनिराळ्या मार्गाविषयी माझ्या गटातील विश्वासाणाऱ्यांना शिक्षण देऊन सुसज्ज करण्यास मी सुरुवात करणार आहे, यामुळे संपूर्ण शरीराची उभारणी होईल."

"छान उत्तम!" टीनोंनी प्रतिसाद दिला. "एकमेकांची सेवा करण्याची गरज आणि संधी सतत बदलत असल्याचेही तुम्हांला आढळेल. नव्या करारात नेमके असेच घडले."

पाळकीय सेवा करणारे इतर वडीलजन इश्माएल व आर्थर वगळून, टीनोंशी सहमत झाले. इश्माएलनी युक्तीवाद पुढे सुरू ठेवला, "टीनो तुम्ही कृपेवर फारच जोर देता. बघा, विश्वासणारे त्यांच्या इच्छेला येईल तसे वागू शकतात असाच तुमच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो. तुमच्या ह्या अशा शिक्षणाने आपल्या मडंळ्यामधील शिस्त पार मोडकळीस येईल!"

"कृपेची योग्य व्याख्या केल्यास कृपेवर द्यावा तेवढा भर थोडाच आहे," टीनोंनी इश्माएलला समजून सांगितले. "तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी करतो, तसेच काहीजण शिकवितात की आपल्या इच्छेप्रमाणे कोणतेही पातक करण्याचा अधिकार कृपा आपल्याला देते. मी असे घातक चुकीचे शिक्षण दिल्याचे तू कधी ऐकले नसशील! तुझी भीती निराधार आहे. प्रेषित पौलाने म्हटले आहे, त्याप्रमाणे देवाची कृपा मिळालेले, 'पापाला मेलेले आहेत' देवाने कृपेची व्याख्या केली तशीच आपणही करू या."

"टीनो पवित्र शास्त्रात याची व्याख्या कशी केली आहे?" इश्माएलने विचारले.

"कृपा म्हणजे लायकी नसताना मिळालेला देवाचा अनुग्रह पश्चात्ताप करणारे विश्वासणारे पापाला मरतात आणि ख्रिस्ताबरोबर नव्या जीवनात उठविले जातात, म्हणजेच देवाच्या कुटुंबात नव्याने जन्म होतो, तेव्हा त्यांना ही कृपा ख्रिस्ताच्याद्वारे विनामूल्य मिळते, ती देवाची दत्तक मुले आणि ख्रिस्तासह देवाच्या अपार समृद्धीचे वारीस होतात."

"पवित्र शास्त्रात अशा गोष्टी कोठे शिकविल्या आहेत?"

टीनोंनी पवित्र शास्त्र उघडले. "एक क्षणभर थांबा मी योग्य शास्त्रपाठ शोधतो." टीनोंनी सांगितलेले संदर्भ इश्माएलने लिहून घेतल्याचे व्हिक्टरने पाहिले, "रोम 5:12 ते 6:18; रोम अध्याय 8;आणि इफिस 2: 4-7" व्हिक्टरनेही हे संदर्भ लिहून घेतले.

"दुर्दैवाने काही ख्रिस्ती शिक्षक कृपेची चुकीची व्याख्या करतात," टीनोंनी स्पष्ट केले, "त्यांना वाटते की याचा अर्थ आपण कधीही कोणालाही दुखवायचे नाही. कितीही किंमत मोजावी लागली तरी आम्ही प्रेमळ नातेसंबंध राखले पाहिजेत. हे मत देवाच्या वचनाचा धोकादायक रित्या विपर्यास करते! देवाच्या राज्यातील पाळकांनी चूक करणाऱ्यांना तोंड देऊन त्यांच्या चुका सुधारल्या पाहिजेत. असे केल्याने तात्पुरते दु:ख झाले तरी हरकत नाही, ख्रिस्ताने व प्रेषित पौलानेही असेच केले होते. ख्रिस्तामधील चूक किंवा पातक करणाऱ्या बंधूसाठी आपल्याला अत्यंत आपुलकीने करता येणारी एक गोष्ट म्हणजे त्याला गरज असेल तेव्हा त्याची चूक सुधारणे. हे दु:खदायक असले तरी केले पाहिजे. तो देवाचे खरे मूल असेल तर मागे फिरेल यासाठी आमचे आभार मानील! चूक करणाऱ्या परंतु पश्चात्ताप करण्यास नकार देणाऱ्या विश्वासणाऱ्यांची सहभागिता सोडून देण्यास आपल्याला सांगितले आहे. अशाप्रकारे पश्चात्ताप न करणाऱ्या ख्रिस्ती लोकांपासून दूर राहण्यास आणि त्यांच्या समवेत प्रभुभोजन न घेण्यास ख्रिस्त आणि प्रेषित पौल अशा दोघांनीही सांगितले आहे."

"अशा प्रकारच्या शिस्तीविषयी पवित्र शास्त्रातील कोणती वचने शिकवितात?" इश्माएलने टीनोंना प्रश्न केला.

टीनोनी पुन्हा पवित्र शास्त्रात पाहून म्हटले "मत्तय 18:15-20; 1 करिंथ 5 आणि तीत 3:10-11." इश्माएल आणि व्हिक्टर दोघांनीही हे संदर्भ लिहून घेतले.

टीनो पुढे सांगू लागले, "कृपेविषयी आणखी एक घातक गैरसमज आहे. तो असा की देव विश्वासणाऱ्यांना त्यांच्या पातकांबद्दल जबाबदार धरणार नाही, असे सांगणे तो त्यांना निश्‍चित जबाबदार धरणार! त्याने केलेली पापक्षमा आम्हांला एवढीच खात्री देते की ख्रिस्त मरणातून उठवून सार्वकालिक शिक्षेसाठी ज्यांना पाठविणार आहे, त्यामध्ये आमचा समावेश नसणार याबद्दलचा इशारा त्याने योहान 5:24-29 मध्ये दिला आहे, तथापि तो आम्हांला सर्वकाळ बरोबर राहण्यासाठी उठविणार असला तरी, ख्रिस्त त्याच्या न्यायासनावर बसून त्याच्या गौरवी राज्याच्या प्रवेश द्वारापाशी आमच्या कृत्यांची परीक्षा पाहणार आहे, तो आमची वाईट कृत्ये जाळून टाकणार आहे. मोशेच्या काही सैनिकांनी देवाच्या पवित्र मंडपात बकायदेशीरपणे लूट आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा मोशेने त्या सर्व वस्तू जाळून टाकल्या, गणना अध्याय 31, मग ख्रिस्त त्याच्या न्यायाच्या कसोटीला उतरतील अशा आमच्या सत्कृत्यांसाठी आम्हांला प्रतिफळ देईल."

घेतले: "1 करिंथ 3:11-15 व 2 करिंथ 5:10"

टीनोनी शोधलेले संदर्भ पुन्हा इश्माइल व व्हिक्टर ह्यांनी उतरवून घेतले:

इश्माएल पुन्हा पुटपुटला, "टीनो तुम्ही कृपेवर खूप भर देता असे मला अद्यापही वाटते."

"तुझी नियमानुसार वर्तन करण्याची वृत्ती सुधारण्यासाठी मी असे करीत आहे इश्माएल."

इश्माएलने आव्हान दिले, "मी ही वचने वाचतो आणि बरोबर कोण आहे तुम्ही का मी ते पाहतो!"

त्याच आठवड्यात मग टीनो व ज्युली पुन्हा व्हिक्टर व लोरीला भेटण्यास गेले. टीनोने विचारले, "व्हिक्टर गेल्या सभेला तुम्ही का आला नाहीत?"

"माझ्यामुळे इश्माएल व आर्थर दुखावले जातील ह्या भीतीचा मला कंटाळा आल्याने आम्ही आलो नाही. आम्ही येशूवर प्रेम करतो म्हणून नाही तर त्यांची इच्छा ते आमच्यावर लादतात म्हणून आम्ही त्यांच्या इच्छेप्रमाणे करतो. दिवसभर कामाच्या ठिकाणी एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी काय करावे याबद्दल इश्माएल बरेचदा मला उपदेशाचे डोस पाजतात. मी सहमत झालो नाही तर ते अपराधीपणाची भावना माझ्या मनात उत्पन्न करतात."

लोरीने आणखी सांगितले, "गटामधील इतर लोक किंवा देव आमचा स्वीकार करणार नाही असे सांगून आर्थर आम्हांला भीती घालतात अशा भीतीच्या छायेत आम्हांला सहभागितेचा आनंद लुटता येत नाही."

टीनोंनी क्षणभर विचार करून म्हटले, "इशमाएल व आर्थर नव्या विश्वासणाऱ्यांना घालवून देत असतील किंवा फूट पाडत असतील तर आम्ही देवाने सांगितल्या प्रमाणे त्यांना शिस्त लावून त्यांच्यात सुधारणा करू."

"तुम्ही त्यांना कशी शिक्षा करणार?" व्हिक्टरने विचारले.

"त्यांना शिक्षा करणार असे मला म्हणायचे नाही! शिक्षा करण्याचे आपण देवावर सोपवू! देव आपल्या मुलांना शिस्त लावतो. केव्हा केव्हा हे वेदनादायी असते पण त्यांच्यावरील प्रीतीखातर तो हे करतो. दुखाविणाऱ्या विश्वासणाऱ्यांची आम्ही कान उघाडणी करतो ते त्यांना शिक्षा करण्यासाठी नाही तर त्यांना पुन्हा पूर्वस्थितीत आणण्यासाठी. गलती 6:1 मध्ये सांगितल्याप्रमाणे विश्वासणाऱ्यांनी काही गंभीर चूक केली तर आपण त्यांना हळूवारपणे पण ठाम निश्चयाने दुरूस्त केले पाहिजे. परंतु त्यांनी सुधारण्यास नकार देऊन पातक करणे सुरूच ठेवले, तर त्यांनी पश्चात्ताप करेपर्यंत आपण त्यांना प्रभुभोजनात भाग घेण्यास मनाई करायची. 1 करिंथ 5 मध्ये असेच सांगितले आहे."

त्यांनी प्रार्थना केली आणि टीनोंनी त्या तरुण दांपत्याला पुन्हा देवाच्या प्रीतीची खात्री पटवून दिली. पुढच्या दोन आठवड्यातच त्यांना धीर आला आणि त्यांनी प्रभुसाठी मोठ्या मेहनतीने काम केले. व्हिक्टरने देवाने त्यांच्यासाठी व लोरी करता काय केले याची साक्ष आपल्या मित्रमंडळीला दिली. सार्वकालिक तारण आणि ख्रिस्तामधील देवाची विनामूल्य कृपा याविषयी त्यांना सांगितले लोरीनेही तिच्या शेजारच्या स्त्रियांना येशूच्या कृपेविषयी सांगितले.

गटाची उपासना सभा संपल्यावर टीनोने व्हिक्टर व लोरीला सांगितले, "तुमच्या मित्रमंडळीपैकी काही जणांनी ख्रिस्ताचा स्वीकार केलेला आहे. मला वाटते व्हिक्टर तुम्ही तुमच्या घरात ह्या गटाचे नेतृत्व पुढारीपण करावे."

"मला हे जमेल असे तुम्हांला खरोखरच वाटते का? मी गटाचे पुढारीपण केलेले इश्माएलला आवडणार नाही. माझ्या हातून कदाचित चुकाही होतील."

"चुका तर आपण सर्वजणच करतो, म्हणून त्याची चिंता करू नको. ज्युली आणि मी, तुला व लोरीला मार्गदर्शन करीत राहू. योग्य गोष्टी करण्याकरिता साहाय्य करू. तुम्ही इश्माएल वा आर्थरची भीती बाळगायची गरज नाही. पाळकीय देखभाल करणारे वडीलजनही आता त्यांच्या पाठीशी नाहीत. आपण आपल्या गटांची बांधणी, उभारणी प्रेमळ नाते-संबंधांवर करण्याचे आम्ही ठरवले आहे."

लोरीने विश्वास व्यक्त केला, "हे ऐकून मला खूप आनंद झाला. इश्माएल व आर्थर आम्हांला अपराधी वाटावे असा प्रयत्न करत राहतील."

"लोरी त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस" टीनोंनी सल्ला दिला, "आणि आता ते तुमचे पुढारी नाहीत."

"आम्ही आमच्या विश्वासात दृढ आहोत तोपर्यंत कृपेचा प्रवाह थांबविण्याचे सामर्थ्य त्यांच्याठायी नाही."

नवा गट सुरू करण्याविषयी चर्चा व प्रार्थना केल्यावर व्हिक्टरने त्याचे पुढारीपण करण्यास संमती दिली. या गटाच्या पहिल्या दोन सभा झाल्यावर तो लोरीला म्हणाला, "गट सुरू करणे सोपे आहे. टीनो व ज्युली ह्यांनी आपल्यासाठी जे जे केले त्याचीच पुनरावृत्ती करणे एवढेच आपले काम आहे."

"आजच सकाळी मी प्रेषित पौलाने 1 करिंथ 11:1 मध्ये केलेली सूचना वाचली, 'जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे. तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा, व्हिक्टर आपण नेमके हेच करीत आहोत. आपण आपल्या मार्गदर्शकांचे टीनोंचे अनुकरण करतो आणि ते ख्रिस्ताचे अनुकरण करतात."

"बरोबर आहे, आपल्या कामाचा परिणाम पाहा," व्हिक्टर आनंदाने म्हणाला, "आपले काही मित्र, त्या मित्रांचे मित्र आणि त्यांचे मित्र ख्रिस्ताकडे येत आहेत! कृपेची नदी माझ्या कल्पनेपेक्षा अधिक वेगाने वाहात आहे!"

नवीन गटाची प्रगती जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या पुढील सभांचे नियोजन करण्यास मदत करण्याकरिता टीनो प्रत्येक आठवड्यात व्हिक्टरची भेट घेत असे. त्यांची ख्रिस्तामध्ये वाढ होत गेली आणि नव्या गटामध्ये देवाचे वचन प्रत्यक्ष आचरणात कसे आणायचे हे त्यांना समजू लागले तशा ह्या भेटी गाठी कमी झाल्या.

मार्गदर्शनाच्या ह्या सत्रांपैकी एका सत्रात टीनोने त्याला संगितले, "आपल्या गटाने देशाच्या दुसऱ्या भागात सेवेसाठी मिशनरी पाठविले आहेत, त्यांना भेटण्यास मी जाणार आहे. काही आठवडे मी येथे नसणार या काळात तू व लोरी तुमच्या गटातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या विविध आध्यात्मिक कृपादानांसह इतरांची सेवा करण्यास मदत कराल अशी माझी खात्री आहे. प्रत्येकाला त्यांची सर्व कृपादाने माहीत असण्याची आवश्यकता नाही. परंतु नव्या करारातील 'एकमेकांच्या' संबंधातील आज्ञा प्रत्यक्ष त्यांनी आचरणात आणणे महत्वाचे आहे"

"एकमेकांच्या संबंधातील आज्ञा काय आहेत?" व्हिक्टरने विचारले.

"या आज्ञामध्ये 'एकमेकांची सेवा करा' 'एकमेकांना बोध करा,' 'एकमेकांवर जिवेभावे प्रेम करा,' 'एकमेकांची क्षमा करा' आणि आणखी बऱ्याच गोष्टी आहेत, यातील काही आज्ञा अनेकवेळा पुन्हा पुन्हा सांगितलेल्या आहेत. यासाठी आमच्यात आणि आमच्या गटांमध्ये प्रेमळ संवाद असणे अगत्याचे आहे."

त्यांनी नव्या करारातून येशू आणि त्याच्या शिष्यांच्या 'एकमेकांसाठीच्या' आज्ञा आणि विश्वासणाऱ्यांमध्ये सवाद असण्याची आवश्यकता असणाऱ्या तशाच आज्ञा शोधल्या व्हिक्टरने त्या सर्व आज्ञांची नोंद त्यांच्या वेगवेगळ्या लागूकरणासह वर्गीकरण करून काळजीपूर्वक केली ती पुढीलप्रमाणे:

## संवाद साधण्यासाठी 'एकमेंकांच्या' संबंधातील आज्ञा

**प्रीती:**

एकमेकांवर प्रीती करा: योहान 13:34-35; 5:12,17; रोम 12:10; 1 थेस्सल 4:9; 1 योहान 3:11,14,23; 4:7,11,12; 2 योहान 1:5; 1 पेत्र 1:22.

नियमशास्त्र परिपूर्णपणे पाळण्यासाठी एकमेकांवर प्रीती करा: रोम 13:8

आमची एकमेकांवरील प्रीती विपूल व्हावी: 2 थेस्सल 1:3.

एकमेकांवरील प्रीती वाढून विपुल व्हावी: 1 थेस्सल 3:12

पातकांची रास झाकून टाकण्यासाठी एकमेकांवर निष्ठेने प्रीती करा: 1 पेत्र 4:8

**एकमेकांची काळजी घ्या:**

एकमेकांबरोबर सहभागिता ठेवा: 1 योहान 1:7

एकमेकांची क्षमा करा: इफिस 3:13; 4:32; कलस्सै 3:13

एकमेकांची पवित्र चुंबनाने अभिवादन करा (काही संस्कृतींमध्ये आलिंगन देतात) रोम 16:16; 1 करिंथ 16:20; 2 करिंथ 13:12; 1 पेत्र 5:14

भाकरी मोडण्यासाठी एकमेकांची वाट पाहा: 1 करिंथ 11:33

एकमेकांचे दु:ख वाटून घ्या: 1 करिंथ 12:26

एकमेकांची सेवा करा (व्यक्तींना व गटांना लागू; एक गट दुसऱ्या गटाची सेवा करतो): गलती 5:13

**सेवा:**

प्रत्येक व्यक्तीने तिला मिळालेल्या कृपादानानुसार एकमेकांची सेवा करावी: 1 पेत्र 4:10

प्रीतीने एकमेकांची सेवा करा: गलती 5:13

एकमेकांशी दयाळूपणे वागा: 1 थेस्सल 5:15

एकमेकांची काळजी घ्या. 1 करिंथ 12:25

एकमेकांची ओझी वाहा: गलती 6:2

एकमेकांचे पाय धुवा (इतरांची नम्रभावाने सेवा करण्याचे प्रतिक): योहान 13:14

एकमेकांना सहकार्य करा: 1 करिंथ 3:9; 2 करिंथ 6:1

**शिक्षण द्या:**

एकमेकांना शिकवा कलस्सै 3:16

एकमेकांना बोध करा: रोम 5:14

**प्रोत्साहन द्या:**

एकमेकांना प्रोत्साहन द्या: कलस्सै 3:16; इब्री 10:25

एकमेकांना बोध करा: इब्री 3:13

एकमेकांशी खरे बोला: इफिस 4:25

एकमेकांकरिता आपला प्राण अर्पण करा: 1 योहान 3:16

एकमेकांना प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन द्या: इब्री 10:24

**उन्नती करा:**

एकमेकांची उन्नती करा (उभारणी करा, आधार द्या): 1 थेस्सल 4:18 व 5:1,11

एकत्र जमून स्तोत्र गाऊन, शिक्षण देऊन, प्रकटीकरण सांगून, भाषेतून बोलून किंवा त्याचा अर्थ सांगून एकमेकांची उन्नती करा: 1 करिंथ 14:26

**आध्यात्मिक काळजी घ्या:**

आपली पातके एकमेकांजवळ कबूल करा: याकोब 5:16

एकमेकांची प्रार्थना करा: याकोब 5:16

गटात आणि गटांमध्ये ऐक्य राखा.

**नम्रभावाने वागा:**

एकमेकांचा आदर करा: रोम 12:10

एकजिवाने राहा: 2 करिंथ 13:11; रोम 12:16; 15:5

एकमेकांना दोष लावू नका: रोम 14:13

एकमेकांच्या विरुद्ध बोलू नका: याकोब 4:11; 5:9

एकमेकांच्या अधीन असा: इफिस 5:21

एकमेकांची सेवा करण्यासाठी नम्रतारूपी कमरबंद बांधा: 1 पेत्र 5:5

**मिळून मिसळून राहा:**

एकमेकांचे सहन करा: इफिस 4:2

एकमेकांशी शांतीने राहा: मत्तय 9:50

एकमेकांचा स्वीकार करा: रोम 15:7; 1 पेत्र 4:9

एकत्रितपणे देवाचे गौरव करा: रोम 15:6

"मला वाटते आमच्या गटातील नव्या विश्वासणाऱ्यांना 'एकमेकांसंबंधीच्या' आज्ञा आचरणात आणण्यास आपल्याला मदत करता येईल," व्हिक्टरने सांगितले, "पण मला एक काळजी आहे. गेल्या वेळी आम्ही भेटलो तेव्हा त्यांच्यापैकी काहींनी एकमेकांशी वाद घातला."

"आपल्या सर्वांनाच देवाच्या साहाय्याची आवश्यकता आहे, कारण अशा प्रकारच्या प्रेमळ आपुलकीच्या संवादाला सैतानाचा विरोध असतो देवाच्या इच्छेनुसार आपण एकमेकांची सेवा करू नये यासाठी त्याची भुतावळ कार्यरत असते. विश्वासणाऱ्यांनी आपल्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग एकमेकांच्या सेवेसाठी केलेला सैतानाला रूचत नाही. तो आणि त्याची हस्तक भुतावळ देवाच्या कृपेचा विनामूल्य प्रवाह खंडीत करण्यासाठी सतत खटाटोप करीत असतात; परंतु, येशूने त्याचे मरण व पुनरूत्थान याद्वारे आपल्यावरील सैतानाचे सामर्थ्य कायमसाठी नष्ट केले, कलस्सै 2:13-15 ही वचने याची पुष्टी करतात."

"आध्यात्मिक कृपादानांविषयी थोडे विस्ताराने सांगता का?" व्हिक्टरने विनंती केली.

"पवित्र शास्त्रातील 'कृपादाने' हा शब्द 'करिश्मा' ह्या मूळ शब्दापासून आला आहे, आणि त्याचा अनुवाद 'कृपा' किंवा 'कृपादाने' असा करता येतो. हे विशिष्ट सामर्थ्य देव इतरांची सेवा करण्यासाठी देतो. हे त्याच्या कृपेचे फलित आहे. आपल्याला मिळालेली कृपादाने आपण एकमेकांच्या सेवेसाठी वापरतो. तेव्हा त्याची कृपा आम्ही आमच्याद्वारे इतरांपर्यंत पोहंचवितो सर्व विश्वासणाऱ्यांना कृपादाने दिलेली आहेत आणि आम्ही ती कोणत्यातरी सेवाकार्यामध्ये उपयोगात आणणे अगत्याचे आहे, इफिस 4:11-12 हेच प्रकट करते."

"आर्थरने मला काल सांगितले की सेवाकार्य म्हणजे मुख्यत्वे करून उपदेश करणे हे खरे आहे का?"

"सेवाकार्य म्हणजे नुसते उपदेश करणे नाही, त्यात आणखी बऱ्याच गोष्टी आहेत!" टीनोंनी जोर देऊन सांगितले "आमच्याद्वारे इतरांना आशीर्वाद मिळावा यासाठी देव सर्व विश्वासणाऱ्यांना विशेष कृपादाने विविध प्रकारच्या सेवाकार्यासाठी देतो," नव्या करारात ख्रिस्ती मंडळ्यांनी वेगवेगळ्या प्रकारे कसे सेवाकार्य करावे याविषयी अपेक्षा व्यक्त केलेली आहे, त्यावर त्यांनी चर्चा केली. इतरांची सेवा करण्याचे मार्ग व्हिक्टरने आपल्या वहीत नोंद करून घेतले.

**पाळकीय समुपदेशन सुधारणा करणे आणि दु:खितांचे सात्वंन करणे**

**आरोग्य, साहाय्य करणे, आणि दया दाखवणे,**

**बोधपर चार शब्द सांगणे, भविष्य संदेश सांगणे आणि उत्तेजन देणे,**

**कारभारीपण करणे ( दान देणे )**

**मध्यस्थीची प्रार्थना करणे आणि कौटुंबिक भक्ती घेणे,**

**विवाह संस्था कुटुंब आणि बालसंगोपन ह्या गोष्टींना आधार देणे,**

**उपासना करणे आणि सहभागितेसाठी विशेष कार्यक्रमांची योजना करणे,**

**सुवार्ताप्रसार करणे, शिष्यत्वाचे शिक्षण देणे आणि देखभाल करणे,**

**नवीन मंडळ्या किंवा गट सुरू करणे आणि मिशनरींना पाठवणे,**

**लोकांच्या गरजांना देवाचे वचन लागू करणे अणि पुढाऱ्यांना प्रशिक्षण देणे."**

व्हिक्टरने मत मांडले, "आमच्या गटाला बऱ्याच गोष्टी शिकवायच्या आहेत हे आता माझ्या लक्षात आले, पण हे सर्व करण्यास आम्हांला जमेल ना!"

"देवाच्या साहाय्याशिवाय हे अशक्य आहे, पण त्याने तुम्हांला मदत करण्याचे अभिवचन दिले आहे."

दुसऱ्या दिवशी सकाळीच दारावरच्या घंटीने व्हिक्टरला जाग आली. त्याने खिडकीतून पाहिले तर "बाहेर इश्माएल उभा आहे! काहीतरी नक्कीच बिघडले आहे!"

तो लगबगीने इश्माएलला आत घेण्यास दार उघडायला गेला तोपर्यंत लोरीने कपडे ठिकठाक केले. धापा टाकत इश्माएल म्हणाला, "व्हिक्टर! व्हिक्टर आज सकाळी तू कामाला जायची गरज नाही!" "का?" व्हिक्टरने जरा मोठ्या आवाजातच विचारले.

"दुकान जळाले!"

"काय?"

"होय, जळून खाक झाले सगळ्या हत्यारांचा शत्रुंचा नाश झाला" इश्माएल रडू लागला. लोरीने येऊन त्याचा हात हातात घेतला आणि व्हिक्टरने त्याच्यासाठी प्रार्थना केली.

मग व्हिक्टरने जळालेले दुकान साफसूफ करण्यास इश्माएलला मदत केली. काही लहान मोठी हत्यारे सोडली तर सर्व काही जळून खाक झाले होते; पण ही हत्यारेही मोलाची होती. दुसऱ्या दिवशीही इश्माएल व्हिक्टरला भेटण्यास आला. बराच वेळ तो शांत बसून होता. लोरीने चहा आणला आणि विचारले, "इश्माएल आमची तुम्हांला काय मदत होऊ शकते?"

त्याने काहीही उत्तर दिले नाही. ते काही वेळ तसेच शांत बसले. शेवटी इश्माएल मोठ्याने म्हणाला, "देवानेच हे सर्व केले!"

"नाही" ठामपणे लोरी म्हणाली. "हे सगळं सैतानाने केले."

"म्हणजे देवाने सैतानाला तसे करू दिले!"

व्हिक्टरने इश्माएलशी बोलण्याचा प्रयत्न केला पण पुन्हा तो बराच वेळ शांतच बसून राहिला, मग शेवटी हळू आवाजात त्याने विचारले, "काडीपेटी आहे का?"

"काडीपेटी" व्हिक्टरने विचारले, "कशाला? तुम्हांला काही जाळायचे आहे का?"

"होय" खिशात हात घालत तो म्हणाला, "तू व लोरीने केल्याच पाहिजेत अशा गोष्टींचा हा कागद जाळून टाकायचा आहे," लोरीने काडीपेटी आणली आणि इश्माएलने तो कागदाचा तुकडा व्यवस्थित काळजीपूर्वक जाळला.

त्याने सविस्तर सांगितले "एकदा मी माझ्या काकांच्या चर्चमध्ये गेलो होतो, माझ्या वडिलांप्रमाणेच त्यांनीही इस्लाम धर्म नाकारला अणि ते आवेशी ख्रिस्ती झाले, पण ते पराकोटीचे शिस्तबद्ध होते. मी तुम्हांला करायला सांगितलेल्या गोष्टी त्यांनीच मला शिकविल्या. ह्या गोष्टी मी केल्या नाहीत, तर देव मला शिक्षा करील अशी भीती मला वाटत असे. त्या भीतीच्या छायेतच मी राहात होतो. मी तुझा मालक असल्याने तुझी अशाच प्रकारे मी काळजी घेतली पाहिजे अशी देवाची इच्छा आहे असे मला वाटले. तुमच्या कडून ह्या गोष्टी

करून घेणे हे माझे कर्तव्य आहे असे मी गृहीत धरले. असे केल्याने देव तुम्हांला शिक्षा करणार नाही, असे मला वाटले. आग लागल्याची घटना घडल्यापासून आपले पाळक टीनो ह्यांनी शिकविलेल्या गोष्टींविषयी मी पवित्र शास्त्रातून वाचत आहे. माझ्या हातून मोठी चूक झाल्याचे मला समजले. मी देवाची कृपा आणि त्याचा पवित्र आत्म्या विरुद्ध लढत होतो."

व्हिक्टर इतका आश्चर्यचकीत झाला की काय बोलावे ते त्याला सुचेना, आणखी थोडा वेळ शांततेत गेल्यावर लोरी हळूवार आवाजात म्हणाली, "मला रडावे की आनंदाने ओरडावे हेच समजत नाही!" तिने दोन्ही गोष्टी केल्या.

दुसऱ्या दिवशी घरी आल्यावर व्हिक्टरने लोरीला सांगितले, "मला दुसरी नोकरी मिळली! माझी परीक्षा घेण्यासाठी एखाद्या तज्ञ जाणकार वेल्डरलाच करता येईल असे काम त्यांनी मला सांगितले. माझा हात स्थिर असून भरभर चालतो, असे तिथल्या अधिकाऱ्यांनी मला सांगितले आणि मला पूर्वीपेक्षा दुप्पट पगार मिळणार आहे!"

"आपले सर्व प्रश्न समस्या जणू निकालात निघाले!" ती उद्गारली.

"तसेच काही नाही. आर्थरला त्याच्या सेवाकार्याचा विस्तार करण्याकरिता कोठल्या तरी मोठ्या मंडळीतील ख्रिस्ती लोकांकडून पैसा मिळाला आहे. तो काही सेवाकार्य करतो हे मला माहीत नाही; पण त्याने तसे त्यांना पटवून दिले. ह्या पैशांचा उपयोग तो आपल्या मंडळीतील लोक भाड्याने घेण्यासाठी करतो आणि त्यांना त्या नियमानुसार वर्तन करण्याच्या गोष्टी शिकवायला लावतो. तो आग लागण्याचा प्रसंग घडण्यापूर्वी इश्माएलने देखील असेच शिकविले होते. टीनो येथे नाहीत त्याचा आर्थरने गैरफायदा घेतला. दोन कुटुंबांना त्याने फूस लावून टीनोंचा गट सोडून त्याच्यामागे जाण्यास भाग पाडले. ते एकमेव सत्य मार्ग नावाची मंडळी सुरू करीत आहेत. घरी येत असताना गेल्या आठवड्यात आपल्या गटात नव्याने आलेल्या कुटुंबाच्या घरी आर्थरला जाताना मी पाहिले. सैतानाच्या बाणाचे विष पसरत आहे!"

लोरी विषण्ण मनाने मट्कन खाली बसली.

**अभ्यास**

या जीवनात देव आम्हांला पुढील आशीर्वाद देण्याचे अभिवचन देतो:

भौतिक आशीर्वाद

आध्यात्मिक आशीर्वाद

[इफिस 1:3 हे वचन आध्यात्मिक आशीर्वादांचे अभिवचन देते. अन्यथा, या जगातील भौतिक दृष्ट्या अत्यंत गरीब असणाऱ्या लक्षावधी ख्रिस्ती लोकांचा आम्हांला काही हिशेब लागणार नाही. तथापि, गोरगरीब विश्वासणारे हे गौरवामध्ये धनसंपत्तीचे वारीस आणि ते ख्रिस्ता बरोबर राज्य करतील.]

पुढे तीन मार्ग दिले आहेत त्यापैकी लोकांना ख्रिस्तामधील त्यांच्या स्थानाची खात्री कोणत्या मार्गाने सर्वोत्तम प्रकारे पटवून देता येईल?

त्यांना सतत भीती दाखवायची की त्यांनी एखादा नियम मोडला, देवाच्या कृपेला अंतरले तर तो शिक्षा देईल.

त्यांनी केलेल्या वाईट कृत्यांची त्यांना सारखी आठवण करून देऊन त्यांच्या मनातील अपराधीपणाची भावना सतत जागृत ठेवायची

देवाच्या वचनातून त्याच्या कृपेविषयी शिकवायचे, याबद्दल देवाला रोज धन्यवाद द्यायचे, प्रार्थनापूर्वक विश्वासाची ढाल वापरायची आणि प्रभुभोजनाच्या द्वारे नियमितपणे संपूर्ण पापक्षमेची खात्री मिळवायची याबद्दल शिकविणे.

[कृपेविषयी देवाचे वचन काय शिकविते याबद्दल तुम्ही अद्याप वाचले नसेल तर कृपा करून रोमकरांस पत्राचे 1 ते 8 आणि इफिसकरांस पत्राचे 1 ते 2 हे अध्याय काळजीपूर्वक वाचा.]

पवित्र धर्मसंस्कारांच्या द्वारे देव त्याचा अलौकिक आशीर्वाद देतो ही बाब बुद्धि प्रामाण्यवादानुसार विचार करणारे बरेचदा नाकारतात. आपल्याला देवाची कृपा कशी मिळते याचे स्पष्टीकरण केवळ मानवी विचार शक्तीने करण्यात कोणता धोका आहे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

[कृपा ही मानवी विचार शक्तीपासून खूप दूर असलेली गोष्ट आहे. पवित्र शास्त्रतील प्रकटीकरणाने प्रकट केल्याशिवाय कोणत्याही धार्मिक पुढाऱ्याला किंवा तत्त्ववेत्त्याला कृपेविषयीची खात्री पटवून देता येत नाही.]

जडवादी सांसारिक संपत्तीच्या आधारे कृपेची व्याख्या करतात. पवित्र शास्त्रातून एक उत्तम व्याख्या द्या:

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

देवाने 'एकमेकांविषयी' च्या आज्ञा दिल्या आहेत, त्यानुसार विश्वासणाऱ्यांनी प्रीतीने एकमेकांची सेवा करावी याकरिता मंडळीला किंवा गटाला संघटित करण्यासाठी तुमच्याकडे काय योजना आहेत?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

विश्वासणाऱ्यांना त्यांची आध्यात्मिक कृपादाने वापरण्याची संधी मिळावी आणि नव्या करारात सांगितलेली सर्व सेवाकार्ये त्यांना करता यावीत अशा प्रकारे तुमच्या गटाची संघटना करण्यासाठी तुमच्याकडे कोणत्या योजना आहेत?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

तुमच्याकडून आणि तुम्ही मार्गदर्शन करीत असलेल्या नव्या पुढाऱ्यांकडून अधिकाराचा गैरवापर किंवा अवास्तव नियंत्रण ठेवण्याचे टाळले जावे यासाठी तुमच्याकडे काय योजना आहेत?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## प्रकरण 4

## व्हिक्टर व लोरी ह्यांना आनंदमय आध्यात्मिक स्वांतत्र्याचा शोध कसा लागला

व्हिक्टर लोरी आणि ज्युली टीनोंना निरोप देण्यासाठी स्टेशनवर गेले. टीनो त्यांच्या मंडळीने पाठविलेल्या मिशनरींना भेटण्यास पुन्हा निघाले होते. तेथील मंडळ्या अद्याप फळ देणाऱ्या झाल्या नव्हत्या. जाता जाता टीनोंनी विनंती केली, "माझ्या गैरहजेरीत कृपा करून माझ्या गटाच्या सभांना हजर राहा, त्यांचे पुढारीपण करण्यात साहाय्य करा. कदाचित मी येथे नाही याचा फायदा लांडगे घेतील त्याकडे लक्ष ठेवा."

"लांडगे?" व्हिक्टरने विचारले, "तुम्हांला नेमके काय म्हणायचे आहे?

"भलीमोठी भुकेने वखवखल्या वाघांसारखी कुत्री दुबळ्या मेंढ्यांच्या मागावर असतात अशा खोट्या मेंढपाळांना येशू आणि प्रेषित पौल 'लांडगे' म्हणतो; कारण ते इतर मेंढपाळांची मेंढरे चोरतात."

"तुम्ही मला सावध केलेत म्हणून बरे," व्हिक्टर म्हणाला, "मला वाटते लांडगा आधीपासूनच आपल्या मंडळी भोवती घुटमळत आहे. आपल्या गटात आपण एकमेव खरेखुरे धार्मिक आहोत असे आर्थरचा चुलत भाऊ शाजी नवीन विश्वासणाऱ्यांना भासवण्याचा प्रयत्न करीत आहे."

"मग काळजीपूर्वक लक्ष ठेवा! सैतानाचा खोटेपणा एखाद्या खमीरासारखा सर्वत्र पसरतो. ह्या खोटया गोष्टी बरेचदा आध्यात्मिक वाटतात आणि त्या साथीच्या रोगाप्रमाणे साध्याभोळ्या विश्वासणाऱ्यांमध्ये पसरत जातात त्यांना ओळखून प्रतिकार करण्यासाठी देव आमचे साहाय्य करतो इफिस 6:16 हे वचन स्पष्ट करते त्याप्रमाणे त्या दुष्टाचे जळते बाण विझविण्यासाठी देव आम्हांला विश्वासाची ढाल देतो. ह्या बाणांमध्ये भौतिकवाद बुद्धिप्रामाण्यावाद, व्यक्तीवाद, अहंकारी दुराग्रह, मूर्तीपूजा, हाव आणि कामासक्तपणा ह्या गोष्टींचा समावेश असतो. भूताखेतांपासून उत्पन्न झालेल्या सिद्धांततत्त्वाचा आमच्यावर दररोजच भडिमार होत असतो."

"तुम्ही व्यक्तीवादाचा उल्लेख केलात," व्हिक्टर म्हणाला, "यामुळे कृपेच्या प्रवाहाला कसा काय अडथळा होतो?"

"तुम्ही विश्वासणाऱ्यांना 'एकमेकांच्या संबंधीच्या आज्ञा प्रत्यक्ष आचरणात आणण्यास सांगाल, तेव्हा तुम्हांला याचा अनुभव येईल. एकमेकांशी संवाद सांधणे रद्द करण्यासाठी सैतान व्यक्तीवादाचा डोस देण्याचा प्रयत्न करील. व्यक्तीवादी खाजगी विश्वासाचा पुरस्कार ते त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने देवाची सेवा करतात. ते बरेचदा उपासना सभेमध्ये इतर कोणत्याही महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी न होता नुसतेच बसून राहतात आणि कानावर पडलेल्या गोष्टी एखाद्या टीप कागदाप्रमाणे मनात साठवून ठेवतात. जवळकीचे आपुलकीच्या प्रीतीचे नाते असलेल्या गटांपासून ते दूर राहतात, अशाप्रकारे दूर राहिल्यामुळे प्रीतीकडे दुर्लक्ष होते, सैतानाच्या व्यक्तीवादाला कवटाळणाऱ्या मंडळ्या क्वचितच् नव्या करारातील 'एकमेकांच्या' संबंधातील आज्ञा प्रत्यक्षात आणण्यासाठी योग्य संघटन करतात."

"'अहंकारी दुराग्रहामुळे' कृपा कशी नाहीशी होते?"

"अहंकारी दुराग्रह विश्वासाची पायाभरणी फक्त ज्ञानावरच करण्याचा प्रयत्न करतो," टीनोंनी उत्तर दिले, "ज्ञान फुगविते असा इशारा 1 करिंथ 8:1 हे वचन देते. आपला पाया एकच, येशू आहे, त्या खडकावर शहाणा मनुष्य आपले घर बांधतो. शहाणा मनुष्य आणि वाळूवर घर बांधणारा मूर्ख मनुष्य ह्या दोघांनीही येशूचे बोलेणे ऐकले. दोघांनाही ज्ञान होते; परंतु, येशूच्या आज्ञा पाळून त्याप्रमाणे वागण्याएवढी त्याच्यावर प्रीती फक्त शहाण्या मनुष्यानेच केली. चांगले सिद्धांत शिकविणे एवढ्यावरच अहंकारी दुराग्रही समाधानी असतो. त्याचा स्वतःच्या श्रेष्ठ ज्ञानावर अमाप भरवंसा असतो आणि येशूने सांगितलेल्या इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करतो."

ज्युली आणखी भर घालत म्हणाली, "काही गर्विष्ठ शिक्षक फक्त तुमच्या डोक्याला एक भोक पाडतात आणि त्यातून त्यांचे स्वतःचे मत तुमच्या मेंदूत भरतात! सुदैवाने अनेक तरुण विश्वासणाऱ्यांना फक्त निष्क्रियपणे 'ऐकणारे श्रोते' म्हणून बसायला आवडत नाही, याकोब 1:22 हे वचन यासंबंधात इशारा देते. एखादी गोष्ट शिकल्यावर त्याविषयी सक्रिय चर्चेतून संवाद वादविवाद करणे त्यांना आवडते पवित्र शास्त्र काय सांगते याविषयी विचार करण्याचे स्वांतत्र्य त्यांना हवे असते आणि दुराग्रही माणसांची मते आंधळेपणाने स्वीकारण्यापेक्षा ते सर्व सत्यामध्ये पवित्र आत्म्याला त्यांचे मार्गदर्शन करू देण्यास प्राधान्य देतात. नुसते शिकण्यापेक्षा देवाचे म्हणणे काय आहे हे जाणून घेऊन त्याप्रमाणे वागण्याची त्यांची इच्छा असते."

"दुराग्रह आपल्याच मताचा आग्रह धरणे नेहमीच चूक असते का?" व्हिक्टरने विचारले, "मेंढपाळ पाळकांनी आपल्या मेंढरांना त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्यास मोकळीक देणे धोकादायक नाही का?"

"अर्थातच सर्व विश्वासणाऱ्यांना पाळकीय देखभालीची गरज असते," टीनोंनी उत्तर दिले, "परंतु, आपण मेंढपाळ पाळकांनी त्यांची पवित्र शास्त्र सांगते त्यानुसार काळजी घेतली पाहिजे."

"ते कसे काय?"

"उत्तम मेंढपाळ विश्वासणाऱ्यांना परिपक्व होण्यास साहाय्य करतो. देवाचे मुक्ती देणारे वचन स्वतःसाठी कसे आचरणात आणायचे याबद्दल त्यांना विचार करण्यास वाव देतात. अन्यथा, आपल्या जगातील मूर्तीपूजक त्यांची मने लोकांना गुलाम करून ठेवणाऱ्या निरूपयोगी तत्त्वज्ञानांनी आणि खोट्या दैवतांनी काबीज करून टाकतील. आपल्याच मताचा आग्रह धरणाऱ्यांना असे वाटते की पुष्कळ अभ्यास करण्यातूनच फक्त देवाची कृपा मिळेल मग ते इतर विश्वासणाऱ्यांना जे सांगतील ते त्यांच्या संकुचित दृष्टीकोनातून आलेले असते."

"मी तरुण पिढीची आहे," लोरीने उत्तर दिले, "इतर ख्रिस्ती लोकांशी मैत्रीचे नाते जोडण्यास मला आवडेल आणि आपले मेंढपाळ पाळक आपल्याला तसे करू देतील असे वाटते."

"पण हे आपण कसे करणार?" व्हिक्टरने विचारले, "इतरांना ते शिकतांना व देवाच्या वचनाचे आज्ञापालन करीत असताना एकत्रितपणे सक्रिय सहभाग घेण्यास आपण कशी मदत करणार?"

"तुम्ही त्यांना पवित्र शास्त्रातील वृत्तांत सांगा किंवा वाचायला लावा," टीनोंनी सूचना केली, "मग वृत्तांतात देवाविषयी काय शिकविले आहे आणि त्याबाबत आपण काय करावे याबद्दल चर्चा करा. वृत्तांतांचे थोडक्यात नाट्यीकरण करून त्यातील भूमिकांचा उपयोग करा. त्यांनी नेमके काय शिकायचे आहे हे अगोदरच स्पष्ट करा. देव आणि त्याचे कार्य यावर मनन करण्यास उपयुक्त ठरतील असे प्रश्न त्यांना विचारा त्यांना प्रोत्साहन पर आणि स्तुती करणाऱ्या कविता किंवा गीते लिहिण्यास सांगा. कायम एकाच व्यक्तीने शिकविण्यापेक्षा लोकांनी एकत्र येऊन शिक्षण देण्याची तयारी करावी."

"अस्सं!" लोरी उद्गारली, "देवाचे वचन शिकविणारी लहान लहान नाटुकली तयार करण्यासाठी मदत करायला मला खूप आवडते! आपण एदेन बागेतील किंवा रूथच्या वृत्तांताचे नाट्यीकरण करायचे का?"

"एस्तेर राणीची भूमिका तू चांगली करशील मला आवडेल बघायला," व्हिक्टरने लोरीला सांगितले, "वडिलांकडून वारश्याने मिळालेला पैसा उधळून टाकणाऱ्या उधळ्या पुत्राची भूमिका मला सहजपणे करता

येईल माझी ख्रिस्ताशी ओळख होण्यापूर्वी मी अशीच उधळपट्टी करीत असे, तसा माझा अनुभव दांडगा आहे!"

"मला धष्ट पुष्ट वासराची भूमिका चांगली जमेल," टीनो हसत हसत म्हणाले, "आपला मुलगा परत आला म्हणून मेजवानी करण्यासाठी उधळ्या पुत्राच्या वडिलांनी हे वासरू कापले. थोरला मुलगा चांगला होता पण, येशूने स्पष्ट केले त्याप्रमाणे त्याच्या वडिलांनी त्याच्या वाईट वृत्तीच्या पण पश्चात्ताप केलेल्या धाकट्या भावाला दया दाखवली ते त्याला आवडले नाही. द्राक्षमळ्यात पूर्ण दिवस काबाडकष्ट करणाऱ्या आणि दिवसाच्या शेवटी कामाला आलेल्या अशा सर्वांना सारखी मजूरी मिळाली हे त्या दिवसभर काम करणाऱ्यांना आवडले नाही. हा थोरला भाऊ त्या मजूरांसारखाच आहे. घोर पातक करणाऱ्यांना सहजपणे विनामूल्य पापक्षमा मिळते हे पाहून चांगले लोकही बरेचदा देवाच्या कृपेला विरोध करतात."

"वडीलजन आम्हांला अशा सर्जनशील मार्गाने शिकवू देतील का?" लोरीने विचारले.

"लोरीला सर्जनशीलतेमध्ये आनंद वाटतो!" व्हिक्टरने स्पष्ट केले, "तिचे वाचनही अफाट आहे आणि त्यातील सुवचने ती लक्षात ठेवते."

"देवाचे वचन सर्जनशील पद्धतीने शिकविण्याचे स्वातंत्र्य आम्हांला आहे" टीनोंनी आश्वासन दिले, "अहंकारी दुराग्रहाशी, आध्यात्मिक लढाई करून विजयी झालो आहोत. आता आमचे वडीलजन तुमच्या सारख्या नवीन विश्वासणाऱ्यांना नाऊमेद करणार नाहीत. तुम्हांला ते देवाच्या वचनावर मुक्तपणे चर्चा करू देतील आणि फळ मिळेल अशा प्रकारे त्याचे शिक्षण देतील."

"सुंदर!" लोरी उद्‌गारली.

"आपल्याच मताचा हेका धरणे नेहमीच चूक असते असे नाही, हे तुम्हीच आम्हांला सांगितले ना," व्हिक्टर आठवून म्हणाला, "यासाठीची योग्य वेळ कोणती?"

टीनोंनी स्पष्टीकरण केले, "देवाच्या वचनावर आधारित असे ठामपणे खात्री पटवणारे आमच्याकडे नेहमीच काही असले पाहिजे. अहंकाराने युक्तीवाद करता यावा किंवा देवाची कृपा मिळवावी म्हणून नाही तर अगोदरच मिळालेल्या कृपेची प्रशंसा करावी म्हणून आम्ही वचनाचा अभ्यास करतो. चुकीचे शिक्षण आणि अयोग्य उपदेश ह्यांच्या विरोधात उभे राहण्यासाठी आपण आपल्याच मताचा आग्रह धरणे आवश्यक ठरते."

"उपदेश केव्हा चूक, वाईट असतो?" व्हिक्टरने विचारले. टीनोंनी स्पष्ट केले, "काही वाईट शिक्षकांना वाटते की त्यांचे श्रोते म्हणजे जणू काही लंबकर्ण गाढवेच आहेत! लोकांनी फक्त बसून आपले हेकेखोर निष्क्रियपणे ऐकावे असे त्यांना वाटते. विश्वासणारे म्हणजे जिवंत शरीर एकमेकांची सेवा करणारे आसपासच्या समाजात सैतानाशी दोन हात करणारे भुकेलेल्यांना अन्न देणारे आणि आजाऱ्यांना आरोग्य देणारे या दृष्टीकोनातून ते कधीत पाहाच नाहीत."

"हे प्रिय देवबापा, आमची सुटका कर!" लोरी कष्टी होत म्हणाली. "त्याने केली आहे" ज्युलीने सांगितले.

टीनोंनी सांगितलेल्या गोष्टी व्हिक्टरने वहीत लिहून घेतल्या त्याकडे पाहून सुस्कारा टाकत तो म्हणाला, "ह्या सर्व गोष्टी मी कधी शिकणार?"

टीनोंनी त्याला धीर दिला, "तुला आणि लोरीला देव आणि त्याची कृपा याविषयी अगोदरच बरेच काही माहीत आहे. ह्या गोष्टी चाळीस वर्षे विश्वासणारे म्हणविणाऱ्या लोकांनाही अजून ठाऊक नाहीत. व्हिक्टर खरोखर तुझी वृत्ती शोधकाची आहे! माझ्या माहितीप्रमाणे तू इतर कोणापेक्षाही अधिक प्रश्न विचारतोस!"

"खूपच जास्त?"

"तसे नाही! तुझी उत्सुकता आणि तारतंत्र्यता ही देखील देवाच्या कृपेचीच देणगी, पवित्र आत्म्याचे कार्य आहे."

"पवित्र आत्मा आपल्याला तारतंत्र्यता कशी देतो?"

"तो आमची मने प्रकाशित करतो," टीनोंनी स्पष्ट केले, "म्हणजे आपल्याला देवाचे वचन आपली जीवने मित्रमंडळी आणि आमचे शत्रू ह्यांना लागू करता येते. 2 करिंथ 4:4 हे वचन सांगते की ह्या युगाच्या दैवताने सैतानाने विश्वास न ठेवणाऱ्यांची मने आंधळी केली आहेत. आम्ही ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तेव्हा कृपेच्या अद्‌भुत चमत्काराच्या द्वारे आम्हांला देवाचे सत्य नेमकेपणाने समजते. पवित्र आत्मा आमच्या अंतरंगात साक्ष देतो, तो गूढपणे आमचे मार्गदर्शन करतो. हे रोम 7 मध्ये पहायला मिळते आम्ही देवाची मुले आहोत याची तो आम्हांला खात्री देतो."

"किती मोठा आशीर्वाद आहे, नाही का!" लोरी उद्‌गारली. व्हिक्टरने विचारले आमची मने प्रकाशित करण्यासाठी पवित्र आत्मा फक्त शास्त्रलेखांनाच उपयोगात आणत नाही का?"

"शास्त्रलेख हाच आमचा आधार अंतिम प्रमाण आहे," टीनोंनी उत्तर दिले, "परंतु स्तोत्र 19 व रोम 1 हे अध्याय प्रकट करतात की आमचे मार्गदर्शन करण्यासाठी देव इतरही माध्यमांचा उपयोग करतो. यामध्ये निसर्ग इतिहास, मित्रमंडळी सद्‌सद्‌विवेकबुद्धी, स्थान, हेतूपूर्वक केलेले मनन चिंतन प्रार्थना अनुभव आणि केव्हा केव्हा स्वप्ने ह्या गोष्टींचा समावेश आहे."

"खोट्या शिक्षकांनी आपल्या मनातील मनसुबे सांगितल्याचे मी यिर्मया 29 मध्ये वाचले," व्हिक्टरने आठवून सांगितले, "खरे आणि खोटे शिक्षण यातील भेद आपण कसा समजून घ्यायचा?"

"खोटे शिक्षण नेहमीच शास्त्रलेखाचे खंडण करते किंवा विपर्यास करते" टीनोंनी स्पष्टीकरण केले, "तसेच यातून आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचे गौरव होत नाही. बरेचदा खोटे शिक्षण मनुष्याची किंवा संघटनेची प्रशंसा करते किंवा सत्तेची हाव असलेल्या धार्मिक अधिकाऱ्यांना अधिकाराच्या स्थानी बसविते."

"अरस आहे का!" व्हिक्टरने म्हटले, "देवाचे वचन ते वापरतात; पण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा उपयोग करीत नाहीत. ते अशा प्रकारे त्यांच्या स्वत:च्या मानवी सामर्थ्यातून शिकवीत आहेत हे आपल्याला कसे समजणार?"

"आणखी एका प्रकारच्या खोट्या शिक्षणाने घोर फसवणूक होते, कारण आशय खरा असला तरी उद्देश किंवा शिक्षणात फक्त आशया पुरतेच वापरतात याकडे लक्ष द्या. आपण शिकवीत असलो तर आपणही आपल्या गटाचे मार्गदर्शन वचनाच्या माध्यमातून केले पाहिजे. आम्ही साक्ष देणे, उपासना करणे, नवीन विश्वासणाऱ्यांना विश्वासात दृढ करणे, सेवाकार्याचे नियोजन करणे, पाळकांना प्रशिक्षण देणे आणि मिशनरी पाठविणे हे कसे करावे यासाठी ते आमचे मार्गदर्शन करते. खोटे शिक्षक बरेच वेळा त्यांच्या शिक्षणाचा गाभा म्हणून पवित्र शास्त्राचा अचूक उपयोग करतात: परंतु ते अशा काही गोष्टी करतात की त्या नव्या कराराच्या विरोधात असतात,"

"तुमची गाडी आता लवकरच सुटेल" व्हिक्टरने सांगितले, "आपल्याला बोलता आले म्हणून बरे वाटले. तुम्ही गाडीत चढण्यापूर्वी आणखी एक प्रश्न विचारतो, पवित्र आत्मा आमचे मार्गदर्शन कशा प्रकारे करतो. आम्ही जे करतो त्याबाबत देवाची इच्छा आम्ही कशी जाणून घ्यायची?"

"काही ख्रिस्ती लोकांना फक्त त्यांच्या भाव, भावना आणि औत्सुक्यपूर्ण अनुभवातून मार्गदर्शन मिळते. इतर लोक फक्त शास्त्रलेख आणि त्या विषयाचे विश्लेषणात्मक शिक्षण यातूनच मार्गदर्शन शोधण्याचा प्रयत्न करतात, आणखी इतर लोकांना त्यांच्या मंडळीतील इतर लोक मार्गदर्शन करतात आणि त्यांच्या पुढाऱ्यांना संतुष्ट करणारी सत्येच फक्त आपलीशी करतात. आपल्याला ह्या सर्व मार्गाचा समतोल साधला पाहिजे. पवित्र आत्मा आम्हांला ह्या शिक्षणाच्या अनुभवांचे एकत्रीकरण करण्यास साहाय्य करतो, जेणेकरून ह्या तिन्ही मार्गाचा उपयोग त्याला आमचे मार्गदर्शन करता येईल. तो आमचे अनुभव व भावभावना, विचारशक्ती व ज्ञान आणि विश्वासणाऱ्यांना प्रेमळ समाज ह्या गोष्टींचा उपयोग करतो, हा समतोल साधता झाला नाही तर मंडळी तिच्या सेवाकार्याच्या एकाच पैलूवर अधिक भर देते. ख्रिस्ताच्या शरीररूपी मंडळीतील चांगला समतोल बिघडून

टाकण्याचा प्रयत्न सैतान करतो. बहुतेक वेळा नेहमीच मंडळीची सर्वात मोठी दुर्बलता म्हणजे तिच्या सर्वात मोठ्या सामर्थ्याचा अधिक वापर होय."

व्हिक्टरने मत नोंदविले, "आर्थर व त्याचे अनुयायी यांच्याशी माझा अद्याप यासाठी त्यांच्या विवेकबुद्धीला सतावतात. मग नवीन विश्वासणारे पापावर मात करण्यासाठी आणि इतरांवर प्रीती करण्याकरिता देव त्यांच्या बरोबर आहे याबद्दल शंका घेऊ लागतात. घुबड... म्हणजे मला म्हणायचे आर्थर बरेचदा देव कशी शिक्षा करतो याविषयी जुन्या करारातील संदेष्ट्यांची अवतरणे देत असतो, त्याच्या 'पेटीतून' फक्त एकच सूर निघत असतो!"

"आर्थर आणि त्याचे अनुयायी जुना व नवा करार यामध्ये फरकच करीत नाहीत," टीनोंनी इशारा दिला, "यामुळे लोक गोंधळून जातात, आपण नियमशास्त्र आणि कृपा यात फरक करण्यास शिकले पाहिजे. जुन्या व नव्या करारांमधील विस्तृत फरक लक्षात न घेणाऱ्या शिक्षकांकडे लक्ष ठेवा. येशूचे मरण आणि पुनरूत्थान यामुळे देवाचा मनुष्यजातीशी व्यवहार करण्याचा मार्ग कायमस्वरूपी बदलून गेला. देवाचे लोक, रोम 6:14 हे वचन स्पष्टपणे सांगते त्याप्रमाणे नियमशास्त्राकडून कृपेकडे गेले. वाईट दुष्ट शिक्षक नियम बुहुगुणित करतात. नियमावर बोट ठेवून चालणारे जुन्या करारातील नियमशास्त्राला बसतात. प्राचीन इस्राएलला लागू असणारे जुन्या करारातील नियम ते वापरतात. एवढेच नाही तर ते मानव निर्मीत नियम शोधून काढतात आणि पालन करतात"

"तुम्ही म्हणालात की जुन्या करारातील नियमशास्त्र फक्त प्राचीन इस्राएल लोकांनाच लागू होते," व्हिक्टरने प्रतिक्रिया दिली, "याचा अर्थ आज जुने नियम लागू होत नाही का?"

"नव्या करारातील मंडळीसाठी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून येशू आणि त्याच्या शिष्यांनी जुन्या करारातील काही नियमांचा पुनरूच्चार केला. उदाहरणार्थ, त्यांनी जुन्या कराराचा आधारस्तंभ अशा सर्व दहा आज्ञांची शब्बाथ पाळण्याविषयीची आज्ञा वगळता पुन्हा पुष्टी केली आपण नव्या करारातील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतो; कारण आपण जुन्या करारातील काही नियमांचे पालन केले आणि इतर नियमांकडे दुर्लक्ष केले तर आपण लोकांना गोंधळात टाकू."

"जुन्यापैकी कोणत्या नियमांचे आपण आज पालन करत नाही?"

"अशा अनेक आज्ञा आहेत, मी सगळ्या आज्ञा सांगत बसलो तर गाडी सुटून जाईल त्यातील काही आज्ञा मी पुन्हा सांगतो, जुन्या नियमशास्त्रात सांगितलेल्या पुढील गोष्टी आपण करीत नाही:

"आपल्या पवित्र मंदिरांत सुंता न झालेल्या लोकांना मज्जाव करणे, आपल्या आई वडिलांना शाप देणाऱ्या मुलांना जिवे मारणे, व्यभिचार करणाऱ्यांना दगडमार करणे."

मूर्तीपूजा करणाऱ्या लोकांना ठार करणे.

आठवड्याच्या सातव्या दिवशी काम करणाऱ्या लोकांना ठार मारणे. लोकांनी केलेली भाकिते खरी झाली नाहीत तर त्यांची कत्तल करणे. लोकांना यरूशलेमेतील सणाला उपस्थित राहण्यास भाग पाडणे. विवाहित मनुष्याला त्याच्या भावाच्या अपत्यहिन विधवेशीही लग्न करण्यास भाग पाडणे.

शेतकऱ्यांना प्रत्येक सातव्या वर्षी त्यांची शेते लागवडीशिवाय पडीक ठेवण्यास भाग पाडणे.

आपल्या आठवड्याच्या उपासनेसाठी नर मेंढराचा बळी देणे.

फक्त यरूशलेमेला प्रवास करून उपासनेसाठी जायचे.

"जुने नियम फारच भयंकर होते!" लोरीने प्रतिक्रिया व्यक्त केली. "ते फारच अवघड होते," टीनोंनी सहमती दर्शवली, "प्राचीन नियमशास्त्राने लोकांना दोषी ठरवून त्यांना मृत्यूकडे नेले, 2 करिंथ 3:6 हे वचन याची पुष्टी करते.''

"का?" लेखणी सरसावून व्हिक्टरने विचारले, "देवाने मोशेला दिलेल्या नियमशास्त्राचा हेतू काय होता?"

"प्राचीन नियमशास्त्राचे तीन मुख्य हेतू होते,

पहिला हेतू रोम 3:20 हे वचन स्पष्ट करते की परमपवित्र देवाने जुने नियमशास्त्र दिले; जेणेकरून लोकांना ते पातकी असल्याचे समजेल. रोम अध्याय 3 आणि गलती अध्याय 3 हे प्रकट करतात की नियमशास्त्र पाप उघड करते आणि अशाप्रकारे मनुष्यजातीची ख्रिस्ताच्या आगमनासाठी तयार करते.

दुसरा हेतू गलती 3:24 ह्या वचनात सांगितल्याप्रमाणे जुने नियमशास्त्र देवाच्या लोकांना ख्रिस्ताच्या आगमनासाठी तयार करणारा शिक्षक होता.

तिसरा हेतू जुन्या नियमशास्त्राने प्राचीन इस्राएल राष्ट्राला शासन व्यवस्था स्थैर्य आशा आणि आनंद दिला स्तोत्र 119:127 ह्या वचनामध्ये दावीद नियमशास्त्राविषयी त्याला वाटणाऱ्या प्रेमाची पुष्टी करतो.

व्हिक्टरने नियम शास्त्रचे तीन हेतू पट्कन वहीत उतरवून घेतले, त्याचे स्पष्टीकरण तो नंतर करणार होता. टीनोंनी तरुण दापत्याला खात्री दिली, "देवाने मनुष्य जाती पाप जुन्या नियमशास्त्राद्वारे प्रकट केले आणि त्याच्या कृपेने तो आमच्या पातकांची क्षमा करून आम्हांला सार्वकालिक जीवन देतो. आता आपण नव्या कराराच्या कृपेमध्ये सहभागी होतो. याचे भाकित येशूचा जन्म होण्यापूर्वी यिर्मया 31:31 मध्ये शेकडो वर्षांपूर्वी केले होते. देवाने यिर्मयाच्या द्वारे प्रकट केले की जुने तात्पुरते नियमशास्त्र जाऊन त्याची जागा नवा करार घेईल. त्यामध्ये देवाचे नियम दगडाऐवजी आमच्या अंत:करणांत लिहिले जातील."

व्हिक्टरने विचारले, "जुने नियमशास्त्र आता आपल्याला लागू नाही असे येशू व त्याच्या शिष्यांनी नव्या करारात कोठे म्हटलेले आहे?"

जुने नियमशास्त्र आता कार्यरत नाही हे सांगणारे शास्त्रभाग टीनोंनी शोधून काढले व्हिक्टरने ते लिहून घेतले:

आता जुन्या करारातील नियमशास्त्र हे प्रीतीच्या नियमाने परिपूर्ण झाला आहे ही प्रतीती हे आत्म्याचे फळ असून देव ते सर्व विश्वासणाऱ्यांना देतो मत्तय 22:38-40 गलती 5:22-23.

आम्ही आता नियमशास्त्राधीन नाही तर कृपेच्या अधीन आहोत, रोम 6:8-18.

आमचे तारण नियमशास्त्राच्या पालनाने नाही तर विश्वासाच्याद्वारे कृपेने होते. गलती 2:16 ते 3:24.

येशूने त्याचे मरण व पुनरूत्थान याद्वारे सर्व सैतानी दुष्ट आत्म्यांवर विजय मिळविला आणि आमच्या विरुद्ध असलेल्या हुकूमनाम्यामुळे मिळालेली मरणदंडाची शिक्षा रद्द केली. कलसै 2:13-17.

नव्या कराराचे गौरव सार्वकालिक असून ते जुन्या कराराच्या गौरवापेक्षा कितीतरी अधिक आहे. जुना करार हा देवाने तात्पुरता दिला असून त्याचे तेज नाहीसे होत चालले आहे, 2 करिंथ 3:7-13.

"बरे झाले!" लोरी उद्गारली, "आम्ही आर्थरचे अनेक विविध नियम पाळावेत यासाठी आमच्यावर दडपण आणण्यासाठी त्याच्याकडे कोणताच आधार नाही, हे आता मला समजले."

"चला, आता लवकरच माझी गाडी सुटेल. जाण्यापूर्वी नव्या कराराच्या कृपेविषयी 2 करिंथ 3:6-10 ही वचने काय सांगतात ते ऐका. त्यांनी वाचले:

"देवानेच आम्हांला नव्या कराराचे सेवक होण्यासाठी समर्थ केले, तो करार लेखी नव्हे तर आध्यात्मिक आहे, कारण लेख जिवे मारतो; परंतु आत्मा जिवंत करितो. जिचा लेख दगडांवर कोरलेला असून जिचे पर्यवसान मृत्यूत होत असे ती सेवा एवढी तेजस्वी होती की मोशेच्या तोंडाचे तेज नाहीसे होत चालले असूनही इस्राएल लोकांना जर त्याच्या तोंडाकडे टक लावून पाहवेना तर आध्यात्मिक सेवा विशेषेकरून तेजस्वी होणार नाही काय? कारण ज्या सेवेची दंडाज्ञा ती जर तेजोमय होती तर जिचा परिणाम नीतिमत्त्व ती किती विशेषेकरून अधिक तेजोमय असणार; इतकेच नव्हे तर जे तेजस्वी होते ते ह्या तुलनेत अपरंपार तेजापुढे तुलनेने हीनतेज ठरले."

घरी आल्यावर व्हिक्टर आणि लोरीने अभ्यास केला. त्यांच्यासाठी टीनोंनी एक वर्णनात्मक तक्ता तयार

केला होता यामध्ये जुन्या करारातील आवश्यक गोष्टी आणि नव्या करारातील त्याला समांतरन परंतु अत्यंत वेगळी तरतूद असणाऱ्या, गोष्टी यांतील मुलभूत फरक दाखविलेला होता.

## जुन्या आणि नव्या करारांची तुलना

वधस्तंभाने संपूर्ण इतिहासाचे विभाजन केले आहे. मसीहा मरण पावला आणि पुन्हा उठला तेव्हापासून देवाने प्राचीन इस्राएलाला दिलेले नियमशास्त्र नुसते पाळण्याचा प्रयत्न करण्याची ही अपेक्षा तो आमच्याकडून करीत नाही; परंतु त्याच्या पवित्र आत्माच्या सामर्थ्याने जीवन जगावे अशी त्याची इच्छा आहे. ह्या तक्यामध्ये नियमशास्त्रावर अधिक भर देणारा जुना करार आणि कृपेच्या बाजूने ठाम उभा राहणारा नवा करार यातील काही फरक दाखवला आहे. योहान 1:17 हे वचन सांगते "कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारे देण्यात आले होते कृपा व सत्य ही येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली."

| **जुना करार** (नियमशास्त्र) | | **नवा करार** (**कृपा**) |
|---|---|---|
| तात्पुरते, यिर्मया 31:31-32, इब्री 8:13 | **कालावधी** | सार्वकालिक इब्री 9:15; 10:10-14 |
| तात्पुरत्या मुल्याचा पशूयज्ञ, इब्री 9:6-10; 10:1 4,8 | **पापक्षमेची साधने** | येशूचे एकच कायमसाठीचे अर्पण इब्री 9:10-11;10:9-10 |
| भौतिक, सांसारिक तात्पुरते अनुवाद 30:15-20 | **प्रतिफळ, शिक्षा** | आध्यात्मिक स्वर्गीय सार्वकालिक इफिस 1:3 योहान 3:16, प्रकटी 20:13-15. |
| देवाच्या लोकांची समुद्राच्या द्वारे गुलामगिरीतून सुटका झाली. निर्गम 14. | **सर्वश्रेष्ठ अद्‌भुत चमत्कार** | येशूचे पुनरूत्थान, त्याच्यामध्ये उठवले गेल्याने आमची मरणातून सुटका झाली लूक 24, रोम 6:1-14; 1 करिंथ 15. |
| शारीरिक सुंता उत्पत्ती 17:10; अनुवाद 10:16.<br>वल्हांडणाचा कोकरा निर्गम 12:1-15 | **दीक्षाविधीचा समारंभ आठवणीसाठी मेजवानी** | बाप्तिस्मा ('अंत:करणाची सुंता') मत्तय 28:18-20; रोम 2:29.<br>येशूचे शरीर व रक्त लूक 22:19-20; योहान 6:25-38. |
| .जुन्या नियमत्रशास्त्राने पाप उघड करून शिक्षा दिली, रोम 3:19-20. | **हेतू** | नव्या करारात देव पापांची क्षमा करून आम्हांला मुक्त करतो, कलस्सै 2:11-17. |
| तात्पुरत्या निवासमंडपात पडद्याच्या मागे निर्गम 25:8-9,23; 40:35; लेवीय 16:2. | **देवाची समक्षता** | पवित्र आत्मा सर्वकाळसाठी आमच्या ठायी वस्ती करतो, योहान 14:16-17; 1 करिंथ 3:16. |
| मोशेने नियमशास्त्र दिले इतर प्राचीन संदेष्ट्यांनी मोशेचे नियमशास्त्र लागू केले योहान 1:17; गणना 12:6-8 | **अत्यंत्त महत्वपूर्ण संदेष्टा** | येशूने कृपा व सत्य हे आणले योहान 1:1, 14-17; प्रे. कृ. 3:22-26; कलस्सै 1:15; इब्री 1:1-4. |
| मुख्य याजक अहरोनाने पृथ्वीवरील परमपवित्र स्थानामध्ये सेवा केली, लेवीय 16:1-27 | **अत्यंत महत्त्वपूर्ण याजक** | येशू गौरवामध्ये आमच्याकरिता मध्यस्थी करतो इब्री 4:4-16; 5:4-10;9:1-14; योहान 14:2-3 |
| दावीदाने राज्ये जिंकून घेतली लेवीय 20:23; 1 शमु 18:7; 2 शमु 7:8-16, अनु 20:16-18 | **अत्यंत महत्त्वपूर्ण राजा** | येशू सर्व राष्ट्रांतील निवडलेल्या लोकांचे पुढारीपण करतो मत्तय 28:18-20; प्रे. कृ. 1:8; इफिस 5:23; प्रकटी 19:15-16. |

| | | |
|---|---|---|
| वेगळे करणे, जबरदस्त विजय निर्गम 6:6-7, 19:1-6, अनु 2:31; 4:1-9 | **अन्य राष्ट्रांशी व्यवहार** | समेट, सर्वांनी शिष्य व्हावे, इफिस 1:4; 2:12-22; 3:1-6; कलस्सै 1:19-22; प्रकटी 7:9. |
| देवाला पाहणे किंवा जवळ जाणे म्हणजे प्रत्यक्ष मरणच, शास्ते 3:22; निर्गम 19:12; लेविय 10:1-2; यशया 6:1-7 | **देवाच्या पवित्र्यामध्ये प्रवेश** | येशूचे नीतिमत्व आम्हांला देऊ केलेले आहे, रोम 5:18-19. |
| भयंकर कठोर शिक्षा होण्याच्या भीतीने नियमशास्त्राचे काटेकोर पालन केले, अनुवाद 6:1-3;28:15-26; निर्गम 20:18-20 | **वर्तणुकीचा आधार** | आत्म्यामध्ये राहा, प्रीतीने आज्ञा पाळा योहान 14:15, रोम 13:8-10; 2 करिंथ 3:3-11 गलती 5:5-6; मत्तय 22:37-40. |
| आठवड्याचा सातवा दिवस, जुन्या निर्मितीचे स्मरण करणे निर्गम 20:8-11; प्रकटी 21:1; लेवीय 25:1-7. | **उपासनेचा सर्वसाधारण दिवस** | प्रेषितांच्या कृत्यांमधील मंडळ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी एकत्र जमत; येशूच्या पुनरूत्थानाने सुरू झालेल्या नव्या निर्मितीचे स्मरण करीत. तरीही कोणत्याही दिवशी एकत्र जमण्यास देव आम्हांला स्वातंत्र्य देतो, लूक 24:1-7; प्रे. कृ. 20:7, इफिस 2:7; इब्री 4:4-11; प्रकटी 21:1-4 |
| पशूचा आणि सण, लेवीय अध्याय 1-7 व 23 | **उपासनेची साधने** | आपण आत्म्याने व खरेपणाने उपासना करून विश्वासणाऱ्यांच्या संगतीत भाकरी मोडतो, योहान 4:24, प्रे. कृ. 2:42 |
| स्वत: प्रयत्न व विशिष्ट नियम लेवीय 11; यशया 55:7 | **पवित्रीकरण** | आमच्या आध्यात्मिक नवा जन्म अणि रूपांतर याद्वारे आम्ही आत्म्याची फळे चाखतो, रोम 14:1-9:17; 1 पेत्र 1:3; 1 तीमथ्य 4:3-5 |
| दहा आज्ञा निर्गम 20:1-17 | **मुख्य आवश्यकता** | पश्चात्ताप करणाऱ्या पातक्याचा येशूमधील विश्वास, योहान 3:16: लूक 24:44-49 |
| विशिष्ट नियम जीवनाच्या सर्व क्षेत्रांसाठी तयार केले होते निर्गम 18:20;24:3 | **मार्गदर्शन** | देवाचा पवित्र आत्मा आम्हांला प्रकाशित करतो इफिस 1:17-20, योहान 14:26; रोम 8:1-27 |
| नियम व दृष्टांत देवदूतांकरवी कळविण्यात आले, गणना 12:6; अनुवाद 31:9 | **मुख्य प्रकटीकरण** | देव देहधारी जिवंत शब्द झाला योहान 1:1-3; इब्री 1:1-3, 2:2-4 |
| ख्रिस्ताकरिता तयारी करणे गलती 3:23-26 | **शिक्षणाचा हेतू** | शरीररूपी मंडळीचा पालट व उन्नती करून विश्वासणाऱ्यांना सेवाकार्यासाठी सुसज्ज करणे, रोम 8:23;28-30, इफिस 4:11-12. |
| न्यायाधीश म्हणून कठोरपणे कारभार केला, निर्गम 18:24-26; मार्क 15:1; प्रे. कृ. 15:10 | **वडीलजनांचा कारभार** | मेंढपाळ पाळक म्हणून नम्रभावाने सेवा तीत 1:5-9;1 पेत्र 5:1-4 मत्तय 20:25-28. |
| दशांश (मिळकतीचा 1/10 भाग) अनुवाद 12:11 | **दान देण्यासंबंधीचे प्रमाण** | एखाद्याचे मन सांगेल तसे संतोषाने द्यावे 2 करिंथ 9:7; 1 करिंथ 16:2 |
| मानवी भाऊबंदांनी तात्पुरते प्रदेशाचे रक्षण केले, उत्पत्ती 12:1-2 17:1-8; अनुवाद 6:1-3; रूथ 4:13-17 | **वारसा** | सार्वकालिक समृद्धीची हमी सर्वसमर्थ पवित्र आत्मा देतो, उत्पत्ती 12:3; इफिस 1:3-14; इब्री 2:14-15;1 पेत्र 1:3-5 |

टीनो गावाला गेल्यानंतर झालेल्या पहिल्याच सभेला त्यांच्या व व्हिक्टरच्या गटांचे काही पूर्वीचे सदस्य आले, हे पाहून व्हिक्टर आश्चर्यचकीत झाला. हे सदस्य सोबत आपल्या मित्रांनाही घेऊन आले होते. ते आर्थरच्या गटात सामील झाले होते. त्यांच्यापैकी काहीजण तर कित्येक आठवडे टीनोंच्या गटाला आलेच नव्हते.

"आता आपण कामकाजाची सभा घेऊ आर्थरने जाहीर केले." आता आपण ह्या गटाकरिता नवा नेता निवडणार आहोत. होय, टीनोंच्या नेतृत्वाखाली आपण बराच गोंधळ अनुभवला आहे. त्यांच्यामुळेच मला नवा गट सुरू करावा लागला. तो गट आता मी ह्या गटात विलीन करीत आहे."

आर्थर बरोबर आलेला एकजण उठून बोलू लागला, "माझे नाव शाजी मी आता याच गटाचा आहे. टीनोंनी अत्यंत बेशिस्तपणे ह्या गटाचे नेतृत्व केल्याचे मी ऐकले. त्यांनी व्हिक्टरसारख्या नवीन विश्वासणाऱ्याला त्याच्या मनाप्रमाणे वागण्याची मुभा दिली. देवाच्या सत्य मार्गाने गोष्टी करण्यात याव्यात यासाठी गटाला पुन्हा रूळावर आणण्यास आम्ही आलो आहोत. आपला नवा नेता म्हणून मी आर्थरचे नाव सुचवतो,"

लोरी व्हिक्टरच्या कानात कुजबुजली, "ह्याला पाहून मला बेडकाची आठवण येते."

व्हिक्टर हसला शाजीचे तोंड वासलेले असल्याचे त्याला दिसले तसेच त्याचा आवाजही बेडकासारखा वाटत होता.

"बंधुजनहो!" इश्माएल ठामपणे म्हणाला, "आम्ही तुम्हांला ओळखत नाही तसेच आमचे पुढारी टीनो ह्यांच्या अनुपस्थितीत मी ह्या निवडणुकीत सहभागी होणार नाही."

आर्थरचे डोळे नेहमीपेक्षा मोठे झाले. त्याने आपल्या ओठांवरून जीभ फिरवली आणि वसकन ओरडला, "इश्माएल, मला वाटले तुझा मला पाठिंबा आहे, होय!"

"आर्थर तुला काय करायचे आहे हे मला माहीत आहे," इश्माएलने उत्तर दिले, "तू आणि मीच त्या योजना आखल्या होत्या तेव्हा मी तुझ्याशी सहमत होतो. तुला आपल्या सर्व गटांवर नियंत्रण ठेवायचे होते. तुझ्या इच्छेप्रमाणे विश्वासणाऱ्यांनी धार्मिक गोष्टी केल्या नाहीत तर तू त्यांना अपराधी वाटायला लावत असे. तुझ्या इच्छेनुसार ते वागले नाही तर देव त्यांना शिक्षा करील अशी भीती तू घालत असे. अपराधीपणाच्या भावनेतून तू त्यांना पैसे द्यायला लावले. लोकांनी तुझ्या मनाप्रमाणे वागावे याकरिता तू त्यांना भीती घातलीस. हे तू माझ्याकडूनच शिकलास." तो क्षणभर डोळ्यांतील अश्रू पुसण्यास थांबला, "त्या सर्व गोष्टींची आता मला लाज वाटते."

"काय....इश्माएल तुला काय झाले?" तोंडाची उघडझाप करीत आर्थर चाचरत म्हणाला.

"मी देवाच्या कृपेच्या नदीचे पाणी प्यालो," इश्माएलने उत्तर दिले, "सर्वसमर्थ देवाने माझ्या आत्म्याचे नवीकरण केले. आर्थर आता मला तुझ्या महत्त्वाकांक्षेत रस नाही. देवाने आपल्या कृपेने माझा व्यवसाय आगीने भस्मसात केला. पैसा व लोकांवर वर्चस्व गाजविणे फक्त एवढाच विचार करण्यापासून देवाने मला परावृत्त केले. माझ्या दुकानाला लागलेल्या आगीबद्दल मी देवाचा आभारी आहे! आता मला आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची सेवा करता येईल. मी त्याच्यावर संपूर्ण अंत:करणाने व जीवाने प्रीती करतो!"

"ह्या खोलीत भूते आहेत!" शाजी कुरकुरला.

इश्माएलने त्याचे बोलणे पुढे सुरू ठेवले, "आर्थर तू येथे का आलास ते मला ठाऊक आहे. तुझ्या नव्या गटात आलेले बहुतेक सर्व विश्वासणारे त्यांच्या त्यांच्या पूर्वीच्या मूळ गटात परत गेले आहेत. तू एक लांडगा आहेस हे त्यांनी ओळखले त्यांनी पाहिले की, तू देवाच्या लोकांमध्ये फूट पाडतोस आणि त्यांच्या मनांवर अधिराज्य करण्यासाठी टीका करतोस. तुझे तुझ्या लोकांवरचे नियंत्रण संपले म्हणून तू आता आमच्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहेस. मेंढरांवर तुझे प्रेम, गटांवर नियंत्रण ठेवण्याच्या तुझ्या हेतूसाठी करून घेतोस"

"देवनिंदा! मध्येच व्यत्यय आणत आर्थर म्हणाला, "होय! ही देवनिंदा अभद्र भाषण आहे! असे वाईट

बोलणे तुला शोभत नाही! इश्माएल आगीत तुझ्या दुकानाचे नुकसान झाल्याने तुला धक्का बसला आहे, आणि त्यामुळेच तुझे मानसिक संतुलन बिघडले आहे! होयच मुळी!"

"सैतान!" ताडकन उठत शाजी ओरडला, "पवित्र आत्म्याने माझे डोळे उघडले, मला भूते दाखविली! इश्माएल आणि व्हिक्टरने त्यांना आणले चालता हो सैताना! एकदम बाहेर! देवाच्या नावाने निघून जा! मी तुला धमकावतो! ताबडतोब चालता हो! "तो आपले हात हलवत वर खाली उड्या मारू लागला त्याचा चेहरा रागाने वेडावाकडा झाला.

"शाजी, कृपा करून शांत हो" व्हिक्टरने विनवले.

अचानक शाजी विचित्र आवाजात बोलायला लागला आता तर त्याचे बोलणे बेडकाच्या आवाजासारखेच वाटत होते, "काल रात्री मला स्वप्न पडले! स्वप्नात एक शिष्य व संदेष्टा ह्यांना पाहिले! आता माझे गूढ प्रकटीकरण ऐका! रात्रभर मी यावर मनन केले! सात भुते इश्माएलच्या दुकानाला लागलेल्या आगीत तेल ओतत होती! टीनो इश्माएल आणि व्हिक्टर त्या भुतांकडे धावले, त्यांच्यापुढे गुडघे टेकून बसले, आग भडकलेली असताना ते त्या भुतांची उपासना करीत होते! मग भुतांनी त्या तिघा विश्वासघातक्यांना पकडून आगीत फेकले!"

"बस!" व्हिक्टर ठामपणे म्हणाला, "आपण येथे आपली स्वप्ने सांगायला आलो नाही. शाजी, दुसरे म्हणजे आपल्या स्वप्नांनी शरीरूपी मंडळीची उन्नत्ती झाली पाहिजे आणि ती देवाच्या वचनाशी सहमत असली पाहिजेत. तू जे काही सांगितले ते विध्वसंक आणि द्वेष उत्पन्न करणारे आहे. तसेच ते बेडकासारखे उड्या मारणे थांबव त्याचा इतरांना त्रास होतो."

अनेक लोक हसले. त्यामुळे शाजी पुन्हा पहिल्यासारखा झाला. तो शांत झाला आणि व्हिक्टर पुढे बोलू लागला, "आपण सर्वजण शांत बसू या. आपण येथे उपासना करण्यास आणि देवाचे वचन शिकण्यास आलो आहोत." अनेक विश्वासणाऱ्यांनी प्रतिसाद दिला, "आमेन!"

"परिस्थिती पूर्ववत केल्याबद्दल आभारी आहे, व्हिक्टर," आर्थरने शांतपणे म्हटले, "मला सुव्यवस्था आवडते. होय! मला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. आपल्या ह्या गटासाठी चांगले नियम असावेत, मी अशी सूचना मांडतो की ह्या गटांचे पुढारीपण करण्यासाठी आपण फक्त दोन वडिलांची नेमणूक करू. त्यांचा कार्यकाल चार वर्षांचा असेल. होय, हे पुढारी टीनो व त्यांना मदत करणाऱ्या इतरांची जागा घेतील. त्यांना गटात सुव्यवस्था राखता आली नाही."

"मी ह्या ठरावाला अनुमोदन देतो!" शाजी ओरडला.

"ही कदाचित लोकशाही असेल" व्हिक्टरने हरकत घेतली, "तथापि, असे नियम कायदे आपले आत्म्यामधील स्वातंत्र्य नष्ट करतात. मी स्पष्ट करून सांगतो. समजा पवित्र आत्म्याने तीनपेक्षा अधिक लोकांना पाळकीय सेवा करण्याचे कृपादान दिले असेल तर काय? तुमचा काय? तुमचा नियम फक्त दोघानांच सेवा करू देणार शिवाय इतर विश्वासणाऱ्यांची पाळकीय सेवा करण्यासाठी देवाने दिलेले आध्यात्मिक कृपादान फक्त दोन वर्षापुरतेच असते का? मग तो ते कृपादान काढून घेतो का? अशा प्रकारच्या मानव निर्मित नियंत्रणामुळे नेतेपदावर असणारे लोक आमचे ख्रिस्तामधील स्वातंत्र्य काढून घेतील. कोणाही व्यक्तींना ते देवाच्या वचनातील आवश्यकता पूर्ण करीत असतील तर पाळकीय सेवा करू देण्याची आम्हांला मोकळीक आहे. मनुष्यांचे नियम आणण्यासाठी देवाचे नियम आम्ही रद्द करणार नाही. सध्याच्या गरजा व संधी ह्यांना अनुरूप ठरतील अशा पद्धतीने आमच्या कार्यपद्धतीत बदल करण्याचे लवचिकता आणण्याचे स्वांतत्र्य आपल्या गटात आहे. 2 करिंथ 3:17 हे वचन आम्हांला खात्री देते की 'जेथे प्रभूचा आत्मा आहे तेथे मोकळीक आहे'"

"तुझे बोलणे टीनोंसारखेच वाटते!" आर्थर कडवटपणे म्हणाला.

"मला आशा वाटते! त्यांच्या गैरहजेरीत ह्या गटाचे पुढारीपण करण्यास मदत करण्याची विनंती त्यांनी मला केली आणि मी तसेच करीत आहे, आता आपण एका वेगळ्याच विषयावर बोलणार आहे. एकमेकांची सेवा

करून आशीर्वादित करण्यासाठी आपण 'एकमेकां' विषयीच्या आज्ञा अधिक प्रभावी मार्गाने प्रत्यक्षात आणण्यासाठी योजना आखणार आहोत."

"देवाचे आभार मानले पाहिजेत!" ज्युली उद्‌गारली.

आर्थरच्या कपाळावर धर्मबिंदू जमा झाले, गटाकडे नजर टाकत तो उभा राहिला. त्याने ओठांवरून जीभ फिरवली त्याच्या घुबडासारख्या मोठ्या डोळ्यांनी त्याने क्षणात खोलीतील सर्वांवर नजर फिरविली आणि तो एकही शब्द न बोलता एकदम खोलीतून बाहेर पडला. त्याच्या मागोमाग शाजी गेला आणि आर्थरसोबत आलेली काही पाहुणे मंडळीही पाठोपाठ उठून गेली. तथापि, पाहुण्यांपैकी काहीजण मागे थांबले व्हिक्टरने गटाचे पुढारीपण केले. त्यांनी नाट्यीकरण केलेल्या पवित्र शास्त्रातील कथा वृत्तांतावर चर्चा करण्यात व्हिक्टरने त्यांना मदत केली. पाहुणे मंडळीपैकी एका महिलेने भडक रंगाचे कपडे घातले होते.

सभा संपल्यावर लोरीने हळूच व्हिक्टरला सांगितले, "मी तिला ओळखले, मी गेले होते त्या पहिल्या सभेत ती होती. पण लोक ख्रिस्ताची त्याच्या अद्‌भुत कृपेबद्दल स्तुती करू लागले तेव्हा ती निघून गेली."

सर्वजण निघून जाईपर्यंत ती महिला तिथेच रेंगाळत होती. आता खोलीत फक्त व्हिक्टर व लोरीच होते. "माझे नाव ज्युडी" तिने पुढे माहिती दिली, "तुम्ही स्वांतंत्र्याविषयी जे सांगितले ते मला आवडले, व्हिक्टर मी स्वत: विश्वासातील उच्च पातळी गाठलेली आहे. देव हा कोणत्याही एका धर्मापेक्षा मोठा आहे हे फारच थोड्या लोकांना समजते. आमचे मन स्वच्छ सरळ आहे. तोवर आम्हांला कशावरही विश्वास ठेवता येतो. तुमचे सत्य तुमच्याकरिता खरे आहे तसे माझे सत्य माझ्यासाठी खरे आहे. हेच खरे स्वातंत्र्य होय! पवित्र शास्त्रातील हे सर्व तपशील बांधून ठेवणारे आहेत! आणि पवित्र शास्त्रातही हिंसाचार आहे! आपण येशूच्या रक्ताने धुतले गेलो आहोत असे यात सांगितले आहे! हे अगदीच मागासलेले वाटते!"

लोरीने उत्तर दिले, "ज्युडी येशूच्या रक्ताने आमच्या पापांची किमंत भरून दिली यावर आमचा ठाम विश्वास आहे."

"येशूच्या त्या लाल कणाशी माझा काय संबंध?"

व्हिक्टरने विचारले, "मग तुम्ही काय तुमचा स्वत:चा देव तयार करीत आहात काय? ही तर मूर्तीपूजा झाली!

"माझा मूर्तीवर विश्वास नाही आणि मूर्ती तर मी कधीच करणार नाही!"

"तुम्ही छिन्नी घेऊन दगडातून मूर्ती तयार करीत नसाल; परंतु, तुम्ही शब्दांनी तुमचा देव तयार करत आहात. आध्यात्मिक जग आणि देव याविषयी तुम्ही स्वत:च स्वत:चा विश्वास शोधून काढलात. विधर्मी मूर्तीपूजकांनी नेहमीच असे केले आहे. तुम्ही देवाची कृपा मिळविणे गरजेचे आहे आणि...."

"तुम्ही मला कृपेविषयी सांगा?" तिने मध्येच व्यत्यय आणला, "मी तुम्हांला सांगते! तुमच्यापेक्षा कृपेविषयी मला खूप अधिक माहिती आहे. देवाच्या न्यायनिवाड्या विषयीचा तुमचा जुनाट सिद्धांत मला मान्य नाही प्रेमळ देव अशा प्रकारे कोणालाही अशी शिक्षा देणार नाही! तारण हे विश्वव्यापी आहे."

लोरीने उत्तर दिले, "इफिस 1:7 हे वचन सांगते की आम्हांला येशूच्या रक्ताद्वारे मुक्ती मिळते. आम्ही देवाच्या अपार पावित्र्याचा अभ्यास केला तोपर्यंत मलाही देवाच्या न्यायनिवाड्याविषयी समजले नव्हते ज्युडी चांगला देव म्हणजे परिपूर्ण प्रीती आणि त्याच्या ठायी चांगुलपणा आहे, म्हणूनच त्याने पापाला शिक्षा करणे योग्य आहे. त्याच्या लोकांनी कायम त्याच्या बरोबर राहावे अशी त्याची इच्छा आहे. परंतु तो परम पवित्र आहे आणि पापाला त्याच्या समक्षतेमध्ये येऊ देत नाही. त्याने तसे केले तर स्वर्गाचा नरक होईल.

"नरक? तू नरकाविषयी बोलतेस? बालिके तो जर असा संतापून शिक्षा करीत असेल तर तो कृपेचा देव नाही!"

लोरीने व्हिक्टरकडे पाहिले, जणू काही ती नजरेनेच त्याला उत्तर देण्याचे आर्जव करीत होती. देवाच्या

न्यायनिवाड्याविषयी टीनोंनी शिकविलेल्या गोष्टी त्याला आठवल्या. पाप, शिक्षा, रक्ताचे यज्ञार्पण आणि परिपूर्ण न्यायनिवाडा ह्यांच्या वेदनादायी पार्श्वभूमीच्या संदर्भात आम्ही देवाच्या कृपेकडे पाहात नाही; तोवर त्याची स्तुती प्रशंसा आम्हांला करता येणार नाही. नरक हीच परिपूर्ण न्यायाची जागा आहे, देवाचा न्यायनिवाडा अत्यंत सरळ आहे नाहीतर तो देव असणारच नाही. स्वर्ग ही कृपा व दयेची जागा आहे. येशूचे वेदनादायी यज्ञार्पण आणि मरण ह्यांची आपण प्रशंसा केली नाही तर देवाच्या कृपेची प्रशंसा आपल्याला करता येणार नाही,"

ज्यूडीचे मन कोठेतरी दूर होते असे वाटत होते. ती ऐकत नव्हती पण शांत होती आणि मध्ये मध्ये व्यत्ययही आणत नव्हती. व्हिक्टर पुढे बोलू लागला, "ज्युडी कृपा करून ऐका. तुमच्या पातकांची क्षमा व्हावी यासाठी येशू ख्रिस्ताने तुमच्याकरिता वधस्तंभावर कसे दु:ख सहन केले, त्याचा विचार करा मग तुम्हीही त्याच्यावर आस्थेने प्रेम कराल. तसेच मनुष्याच्या कल्पनेनुसार त्याला छोटेसे मर्यादित स्वरूप देण्याचा विचारही तुमच्या मनाला शिवणार नाही."

लोरीने विनंती केली, ''कृपा करून आम्हांला घरी ये ऊन तुमची भेट घेऊन ह्या गोष्टी शिकविण्याची परवानगी द्या द्याल ना?"

"मला वाटते नाही! त्यांनी तुमचे चांगलेच मन परिवर्तन केलेले दिसते! मी देवाचे आभार मानते ह्या सर्व सिद्धांत तत्त्वांपासून मी स्वतंत्र राहिले, चहाबद्दल धन्यवाद अच्छा, गुडनाईट."

ज्युडी गेली आणि लोरी पट्कन खूर्चीत बसली. दीर्घकाळ शांततेत गेल्यावर ती सुस्कारा सोडत म्हणाली, "मी तिच्याजवळ उभी होते तेव्हा मला अंमली पदार्थांचा वास झाला."

"मीही तिच्या हातावर सुयांचे वण पाहिले," व्हिक्टरने पुष्टी केली, "ती ड्रग्ज घेत असावी. ठाम पक्क्या सत्यावर विश्वासाची उभारणी करण्यास नकार देणारे लवकरच खोट्या धर्मांचा बळी ठरतात. ज्युडी तिच्या स्वत:च्यात अविश्वासाची कैदी आहे."

"लोकांना त्यांच्या इच्छेनुसार कशावरही विश्वास ठेवता येतो, असे तिने सांगितले!"

"तिच्यासारखा विचार करणारे लोक स्वत:ला शास्त्रलेखातील वस्तुस्थिती आणि सत्ये यापासून दूर ठेवतात. ते स्वत:भोवती एक कोश तयार करतात. कोणत्याही ख्रिस्ती धर्म सिद्धांत तत्त्वापेक्षा ज्युडीचा कोश अधिकच बंदिस्त आहे. ती स्वत:ला तिच्याच स्वप्नमय जगामध्ये कोंडून ठेवते. ती स्वतंत्र आहे, असे ती म्हणते, पण असे लोक जोपर्यंत देवाच्या कृपेतून येणाऱ्या प्रीती सारखी प्रीती करीत नाहीत, तोवर स्वतंत्र होत नाहीत"

त्यांनी ज्युडीकरिता प्रार्थना केली. मग घरी जातांना लोरीने व्हिक्टरला सांगितले, "तुमचे बोलणे टीनोंसारखेच वाटत आहे! लोक प्रेम करीत नाहीत तोवर लोक स्वतंत्र नाहीत ह्या तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय?"

"टीनोंनी मला समजावून सांगितले आहे. पापी लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे प्रत्येक गोष्ट करता येत नाही कारण त्यांना वाईट गोष्टी करायच्या असताना, पोलीस, समाज, सद्सद्विवेकबुद्धी आणि देव त्यांना असे करण्यापासून परावृत्त करतील. केवळ परिपूर्ण प्रेमळ व्यक्तींनाच त्यांच्या मनाप्रमाणे करण्याचे स्वातंत्र्य देण्याची परवानगी आहे; कारण त्यांची इच्छा नेहमीच चांगली असते. येशूने म्हटले, शेजाऱ्यावर प्रीती केल्याने संपूर्ण नियमशास्त्राचे पालन होते."

"आता मला समजले व्हिक्टर, प्रीती करणाऱ्या लोकांना त्यांना हवे ते करण्याची मुभा असते; कारण जे करण्याची त्यांची इच्छा असते ते इतरांच्या कल्याणार्थ असते. हे कसे ते आता माझ्या लक्षात आले! पुनरूत्थानामध्ये सार्वकालिकतेपर्यंत आपल्या ठायी पाप असणार नाही. आपण देवावर आणि एकमेकांवर इतके प्रेम करू की शेवटी आपल्याला हवे ते करण्याचे परिपूर्ण स्वातंत्र्य मिळेल. देवाला गौरव असो!"

गावाहून परत आल्यावर टीनोंनी व्हिक्टरचे अभिनंदन केले, "आर्थर आणि त्याच्या दोस्तांनी गटाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केल्यावर तू कशा प्रकारे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केलीस ते इश्माएलने मला सांगितले

धन्यवाद! इतरांनीही मला सांगितले की तू व लोरी त्यांच्याकरिता आशीर्वाद आहात. तुझ्या नव्या गटाने दोन नवे गट सुरू केले आणि त्यांच्या नव्या पुढाऱ्यांना तू मार्गदर्शन करीत आहेस. आपल्या प्रभु येशूची स्तुती असो!"

"तुम्ही आमच्याकरिता जे केले तेच मी करत आहे. मी तुमचे अनुकरण करीत आहे. टीनो अशा प्रकारे काम करणे सोपे आहे. फारच सोपे आहे!"

लोरी उद्‌गारली, "वा! देवाच्या कृपेचा प्रवाह अखंड वाहात आहे! कुटुंबा कुटुंबात आणि मित्रा मित्रांकडे तो वाहात आहे! चला आपण त्याची स्तुती करू या!"

"अनेक ठिकाणी देवाच्या कृपेचा प्रवाहत आहे," टीनोंनी माहिती पुरवली, "आपल्या मिशनरींनी सुरू केलेले गटही वेगाने नवे गट तयार करत आहेत ते निर्भयपणे सैतानाच्या प्रदेशावर चाल करून जात आहेत! नियमशास्त्राचे काटेकोर पालन यात ते आपल्यासारखाच संघर्ष करत आहेत; तथापि, प्रत्येक ठिकाणी ख्रिस्तामधील विश्वासणारे कृपा व सामर्थ्य यासाठी त्याच्या नावाचा धावा सर्वसमर्थ देव हा सैतान आणि त्याचे दुष्ट आत्मे ह्यांच्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे हे पवित्र आत्मा दाखवितो."

लोरीला रडू कोसळले.

"काय झाले?" व्हिक्टरने विचारले.

"कित्येक लोकांना हा महान आशीर्वाद ठाऊक नाही! देवाच्या अद्‌भुत कृपेविषयी मला एक कविता लिहायची आहे. इतरांनाही ती वचून आपल्या बरोबर आनंद करता येईल; पण, मी काही तंत्रशुद्ध कवयीत्री नाही. यमक जुळवणे मला जमत नाही."

"लोरी" टीनो हळूवार आवाजात म्हणाले, "तू कविता तर लिही. यमक जुळलेच पाहिजे असे नाही. तुझा विचार प्रवाह रोखणारा कोणताही नियम नाही. अभिजात काव्याच्या दबावाची काळजी करू नकोस. जे प्रभुने सुचविले ते फक्त कागदावर उतरव."

"मला जमेल का? खरंच?" तिने व्हिक्टरकडे पाहिले, "ईश्वरपरिज्ञान समजून देण्यात मला मदत कराल का?"

काही दिवसांनी व्हिक्टर व लोरी हे टीनो ज्युली आणि इश्माएल ह्यांना भेटले, "लोरी काही वाचून दाखविणार आहे," व्हिक्टरने जाहीर केले. तिने लाजत सुरुवात केली. तिचा हळूवार आवाज दडपणामुळे चाचरत होता:

**जुनाट सर्प देवाच्या नव्या निर्मितीशी दोन हात करतो**

**देवाची मुक्त करणारी कृपा हिमालयापेक्षा उंच अशा प्रदेशातून वाहते, गंगा, अमेझॉन, यांगत्से व नाईल ह्या एकत्रित नद्यांपेक्षा मोठी नदी!**

**ती सर्व विरोधाच्या भिंती जमीनदोस्त करते; ती पृथ्वीवरील प्रत्येक प्रदेशापर्यंत पोहंचते.**

**तिच्या आरोग्यदायी, जीवनदायी, संपूर्ण क्षमादायी प्रवाहाची मला चव घ्यायची आहे!**

**आरंभी पृथ्वीच्या कमकुवत कवचाला तिचा भार पेलला नाही. पापी मानवी अंतःकरणांना स्पर्श केल्याने डाग पडला तर तिची शुद्धता लयास जाते.**

**जिथे दुष्ट आत्मे त्यांची दुर्गंधी पसरवतात तिथे आत्म्यांचे हसू मावळते आदामाचे पतन झाले तेव्हा नरकातील सैन्याने विजयाचे वीभत्स गीत गायले!**

**मग देवाची धनगंभीर निश्चयी वाणी झाली, "सापाने पृथ्वी व मनुष्य दोघांनाही बिघडवले."**

**त्याचा बळी, मनुष्य स्त्रीपासून जन्मलेला सर्पाचे डोके ठेचेल!" भुतांनी टिंगल केली, "पापाने सर्व मनुष्यांत पाय रोवले म्हणून देवाच्या शापातून कोणाचीच सुटका नाही!**

**आपण फक्त एखाद्याचे पाप दाखवायचे म्हणजे त्याची क्षणात धूळ होईल!"**

देवदूतांनी जरब बसविणारे परात्पर देवाचे शब्द ऐकले. देवापित्याने देवपुत्राला आज्ञा केली.

"जा मार्ग तयार करा. आपल्या सर्वोच्च सिंहासनापासून कृपेचा प्रवाह सर्व मानवजातीपर्यंत वाहू द्या."

भुतांनी टिंगल केली, "पृथ्वीचे कवच अगदीच तकलादू आहे आणि त्या नदीचा प्रवाह तर मोठा ते पेलण्याचे बळ तिला कधीच लाभणार नाही!"

देवाने आपल्या पुत्राला सांगितले, "जा पृथ्वीवर जा, दुर्बल असले तरी मानवी देह धारण कर."

मानवजातीच्या पीडा व दु:खात सामील हो! पापाच्या कटू शापाची चव चाख!

पाण्याचा प्रवाह रोखणाऱ्या सर्व भिंती वितळून जाण्यासाठी रक्ताने मार्ग रोखून धर.

पृथ्वीवर असणाऱ्या होऊन गेलेल्या व येणाऱ्या प्रत्येक जीवाला मुक्त करायचे आहे!"

भुतांनी दात विचकत टिंगलीच्या सुरात देवाच्या आदेशाला उघड आव्हान दिले.

आद्य देवदूतांनी हे पाहिले, आश्चर्याने विचारले, "हे प्रत्यक्षात होईल काय?

परमपवित्र देव इतक्या जवळ जाऊन अशा लाजिरवाण्या व दुर्गंधीयुक्त गोष्टींना स्पर्श कसा करणार?

ह्याचे बीज संपूर्ण पृथ्वीभर मनुष्याच्या शत्रूने सैतानाने पेरून ठेवलेले आहे!"

बंडखोर आत्म्यांनी फुशारकी मारली, "मानवी तारणाऱ्याला प्रयत्न करू देत! देवाचे पवित्र्य अडथळा आणेल!

पातक करून मनुष्यांनी त्यांच्या आत्म्यांचे सार्वकालिक भवितव्य आपल्याकडे सोपविले.

तर नदीचा खोल पाया घालू देते, किड्या मुंग्यांना प्रयत्न करा!

मग आनंदाने आपण असे आशाहीन इच्छित योजनांचा सहज बोजवारा उडवू!"

देवदूतांनी सांगितले, "देवाच्या हाताला वेळेचे काळाचे बंधन नाही. कोणत्याही काळोखाने त्याचे डोळे मिटत नाहीत, त्याला अंतराचे बंधन नाही.

कारण तोच एकटा सर्वत्र आणि सर्वकाळ असतो! त्याला समयाचे बंधन नाही.

थोर मी आहे. कोणत्याही वेळी किंवा ठिकाणी प्रवेश करतो."

अशा प्रकारे दृश्य व अदृश्य दोन्ही सर्व जग उभारणारा खाली उतरला. निर्मितीत प्रवेशण्यासाठी नम्र मरीयेच्या उदरी जीवन आकारले आणि तिचे कुमारीपण जपत देवाच्या पुत्राचे व मनुष्याचे गर्भधारण झाले.

मग त्या दुबळ्या पण पवित्र बालकाला ठार करण्यासाठी त्या भुतांच्या सैन्याने क्रूर युद्ध आरंभले.

नरकातील पिशाच्च ओरडली, "मारा त्याला! त्याच्या कुशीत भाला भोसका आणि रक्त कसे येते ते पाहा!"

तो मेला धरणीकंप झाला आणि मेघगर्जना झाली पावसाने त्याचे रक्त सर्वदूर नेले.

सैतानाचे हावरट पंजे अत्यंत ओंगळवाण्या प्रकाराने मिळविलेला विजय ओरबाडण्यासाठी पुढे झेपावले.

योनाच्या भुकेल्या माशाप्रमाणे त्याने जणू येशूचे जखमी शरीर कच्चेच गिळले!

अहंकराने फुगलेला सर्प प्रौढी मिरवतो, "मी जिंकलो! माझ्या दोस्तांनो मजा करा!

प्रत्येक वेळी एक मनुष्य मेल्याने माझा खजिना कसा वाढतो ते त्या स्वर्गातील देवदूतांना पाहू देत!

आता आपल्या मृत्युलोकांत ख्रिस्त माझ्या हाती असहाय्यपणे पडला आहे. देवाने आम्हांला स्वर्गातून हाकलून दिले, पण आता आपण पुरता सूड उगवला आहे!"

**नरकाच्या कानाकोपऱ्यातून विजयाचा ध्वनि घुमला, "देवाने आपला शब्द पाळलाच पाहिजे!"**

**त्याने त्याच्या येशूला मरू दिले तो 'तारक' मूर्खपणा असल्याचे सिद्ध झाले!**

**तो हरला! पापी मनुष्यांनी मेलेच पाहिजे असे प्रत्यक्ष देवाचे नियमशास्त्रच सांगते.**

**स्वर्गाच्या नियमाप्रमाणे आमचे आरोपपत्र त्यांच्या कबरांवर टांगलेले आहे!"**

**शब्बाथाचा पूर्ण दिवस आमच्या मृत प्रभूने पूर्ण विसाव्यात काढला, या एकाच माणसाने देवाचे नियमशास्त्र काटेकोरपणे पाळले. सैतान मत्सराने आंधळा झाला. त्यामुळे प्रीतिचे कार्य त्याच्या दृष्टीस पडले नाही.**

**शेवटच्या आदामाच्या रक्ताने सर्व मनुष्यजातीचे पाप क्षालन होणार!**

**देवाच्या नव्या आठवड्याचा पहिला दिवस उजाडला आणि येशूने सैतानाची पकड मोडून काढली.**

**नरकाच्या भुतावळीला धाप लागली. पराभव! घोर निराशा! परंतु देवदूत आश्चर्याने ओरडले.**

**"किती मोठा आनंद! संदेष्टे, दावीद व स्तोत्रे यांनी भाकित केले होते तरी आपल्याला जे दिसले नाही ते आता स्पष्ट दिसले! स्वर्गीय सैन्याने देवाचा जयजयकार करावा!"**

**"ख्रिस्ताने उठलेच पाहिजे" सर्वोच्य न्यायाधिशाने स्पष्ट केले." तो परमपवित्र आहे!**

**पापासाठी मृत्यूचा हुकूम देणाऱ्या आदर्शातच चांगल्या मनुष्याने जिवंत राहिले पाहिजे असे सांगितले आहे.**

**एकही नीतिमान माणूस मरणार नाही तर सदासर्वकाळ देवाची संगती लाभेल. निष्पाप मनुष्याला सैतानाचे धारदार सुळे धरून ठेवू शकत नाहीत.**

**येशू मृत्यूचा बंद दरवाजा मोडून पुन्हा उठला, तेव्हा देवदूतांनी मोठा जयोत्सव केला.**

**आणि नोहाच्या तारवातून बचावून काढलेल्या मानव वंशाप्रमाणे, पृथ्वीच्या कालाच्या पलिकडे विश्वासात मरण पावलेले सर्व बंदिवान आणि लवकरच मरण पावणारेही त्याच्यामध्ये उठले, ख्रिस्ताचे कार्य संपूर्ण सर्वकाळ व्यापणारे आहे.**

**भुतांकडे फसवणूक करण्याचे सोडता कसलेही सामर्थ्य उरले नाही. ह्या खोटेपणावर भरंवसा ठेवणाऱ्यांना तो प्राणघातक गाळ पिऊ देत! बाकीच्या सर्वांसाठी देवाची नदी वाहते! तहान लागलेल्या सर्वांनी यातून मुक्तपणे प्यावे!**

**वा! ख्रिस्ताच्या प्रीतीचा अनुभव घ्या! त्याची कृपा कायमसाठी आपलीशी करा!**

### अभ्यास

देवाच्या कृपेचा प्रवाह खंडीत करण्यासाठी सैतान उपयोगात आणणाऱ्या गोष्टींपुढे खूण करा:

वैयक्तिक विश्वासाचा शोध करणारा व्यक्तीस्वातंत्र्यवाद.

इतरांची मते ऐकण्यास नकार देणारा किंवा ख्रिस्ती सेवाकार्य शिक्षण पुरतेच मर्यादित ठेवणारा अहंकारी दुराग्रही मत.

शास्त्रलेखाऐवजी मनुष्यांच्या रूढी परंपरांचे पालन करणे.

लोकांनी फक्त निष्क्रियपणे ऐकत राहावे अशा पद्धतीने शिकविणे.

मूर्तीपूजा करणे यात एखाद्याला त्याच्या इच्छेप्रमाणे, जोवर त्याचे मन स्वच्छ आहे तोवर, कशावरही विश्वास ठेवण्याच्या प्रकाराचा समावेश आहे.

सत्तेची हाव असणारे पुढारी फक्त नियम लादतात आणि इतरांना पुढारीपणाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास मदत करत नाहीत.

विश्वासणारे त्यांच्या विविध आध्यात्मिक कृपादानांच्या मदतीने एकमेकांची सेवा करण्यात अपयशी ठरतील अशा पद्धतीने संघटना बांधणे.

प्रीती वगळता अन्य हेतूंसाठी, जसे नाकारले जाण्याचे भय किंवा धमकी, देवाचे आज्ञापालन करण्याची मागणी करणे.

एखाद्याकडे किती धनसंपत्ती आहे यावरून देवाच्या कृपेचे मोजमाप करणारा भौतिकवाद.

देवाची कृपा आमच्याकडे अद्‌भुत अलौकिक मार्गाने येते हे नाकारणारा बुद्धिप्रामाण्यवाद.

[देवाच्या कृपेवरील लोकांचा भरवंसा उडून जावा. विश्वास कमकुवत व्हावा यासाठी नरकातील भुतावळ वरील सर्व दुष्ट अस्त्रांचा उपयोग करते].

नवा करार शिक्कामोर्तब करते त्या आज्ञा वगळता आज आपण जुन्या करारातील नियमशास्त्राचे पालन का करीत नाही?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

नियमशास्त्राच्या कराराची जागा घेणारा कृपेचा पूर्णपणे नवा असा करार ख्रिस्ताने स्थापन केला हे विश्वासणाऱ्यांना समजण्यास मदत होइल. याकरिता तुम्ही नव्या करारातील कोणात्या शास्त्रभागांचे साहाय्य घ्याल?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

देवाच्या कृपेच्या नदीच्या प्रवाहातून आमच्याकडे प्रकाश व स्वातंत्र्याचा ओघ येतो. हा ओघ लोकांनी आपलासा करावा यासाठी त्यांच्याकरिता तुमच्याकडे कोणत्या नव्या योजना आहेत, ते स्पष्ट करा:

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net